मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६८ ■ बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## २९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई ‘डेली’ विमानसेवा



**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या उद्योग, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला मोठी गती देणारी बातमी समोर आली आहे. २९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई मार्गावर 'इंडिगो' कंपनीची विमानसेवा आठवड्यातील सातही दिवस सुरू होत आहे. विशेष म्हणजे ही सेवा सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन सत्रांत उपलब्ध होणार असल्याने प्रवाशांचा मोठा वेळ वाचणार आहे.कोल्हापूरकरांना आता मुंबईतील आपली कामे आटोपून त्याच दिवशी परतणे शक्य होणार आहे.

# शासकीय कामकाजात ‘एआय’च्या प्रभावी वापरावर भर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ज आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात ‘एआय’च्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लिडरशिप फोरम २०२६च्या चर्चासत्रात पत्रकार विष्णु सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील



शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास ‘एआय’ क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे जाऊ शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये भारताचे जागतिक नेतृत्व**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या (DPI) अनुभवाच्या आधारे स्वतःची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे.

# पनवेलमध्ये रुग्णसेवेचा नवा अध्याय: प्रामाणिक ॲम्बुलन्स सेवेसाठी चालक-मालकांची जनहित संस्था

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** शहरात गेल्या काही वर्षांत ॲम्बुलन्स असोसिएशनच्या संघटना उभ्या राहिल्या, पण काही काळातच त्या विस्कळीतही झाल्या. अनेक वेळा समिती सदस्यांनी सर्वांना विश्वासात न घेता स्वतःचा व्यवसाय वाढवण्यावर भर दिल्याच्या तक्रारी समोर आल्या. परिणामी काही मोजक्या लोकांकडे जास्तीत जास्त कॉल वळवले गेले, तर इतर ॲम्बुलन्स चालक-मालकांना डावलले गेले. या परिस्थितीत रुग्णांची आर्थिक लूट आणि सेवेत असमतोल वाढल्याचेही निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर अन्याय सहन करणाऱ्या प्रामाणिक ॲम्बुलन्स चालक-मालकांनी एकत्र येत “ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्था” शासनमान्य नोंदणीकृत




स्वरूपात स्थापन केली आहे. संस्थेचा मुख्य उद्देश शासकीय नियमांनुसार पनवेलमधील प्रत्येक रुग्णाला वेळेवर, पारदर्शक आणि परवडणाऱ्या दरात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देणे हा आहे.

संस्थेने स्पष्ट भूमिका घेतली आहे की कोणताही चालक-मालक डावलला जाणार नाही, कुणावरही अन्याय होणार नाही आणि सर्वांना सोबत घेऊन संस्थेचे कार्य पार पडेल. रुग्णसेवेची गुणवत्ता उंचावण्यासाठी सभासदांना मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थेमार्फत BLS (Basic Life Support) प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच सदस्य चालक-मालकांसाठी पाच लाख रुपयांचा टर्म विमा देण्याची महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येणार आहे.

रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांचा विश्वास दृढ करण्यासाठी संस्थेने काही कठोर आचारसंहिता जाहीर केल्या आहेत. कोणताही सभासद रुग्णांची आर्थिक लूट करणार नाही, मृत रुग्णांच्या अंगावरील दागिने किंवा रोख रक्कम प्रामाणिकपणे नातेवाईकांना परत केली जाईल, आणि सेवा पूर्णतः पारदर्शक पद्धतीने दिली जाईल—अशी ग्वाही देण्यात आली आहे. काहींच्या गैरप्रकारांमुळे प्रामाणिक ॲम्बुलन्स चालकांची प्रतिमा मलिन झाली होती; त्या बदनामीवर पूर्णविराम देणे हा संस्थेचा ठाम निर्धार आहे.

शासनाकडून ॲम्बुलन्स चालक-मालकांना थेट सुविधा मर्यादित असतानाही, समाजाभिमुख सेवेसाठी पुढाकार घेणारी ही संस्था रुग्णकेंद्री दृष्टीकोनाने काम करणार आहे. “रुग्णांची सेवा हीच आमची प्राथमिकता” या भावनेतून परवडणाऱ्या दरात, तत्पर आणि विश्वासार्ह ॲम्बुलन्स सेवा देण्याचा संस्थेचा संकल्प पनवेलसाठी आशेचा किरण ठरत आहे.

स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करतील आणि आम्ही प्रामाणिकपणा आणि एकजुटीच्या बळावर पनवेलमध्ये रुग्णसेवेचे नवे मापदंड निर्माण करू अशी आशा निर्माण करू.

# रुणांनो, नोकरी मागणारे नको, देणारे बना! : प्रा. प्रमोद शर्मा

## इंद्रराज महाविद्यालयात ‘आजीवन शिक्षण विस्तार’ कार्यशाळेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** "केवळ पदवी मिळवून नोकरी शोधण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी कौशल्याधारित शिक्षणाची कास धरावी. स्वतःमधील सुप्त गुण ओळखून स्वयंरोजगाराकडे वळावे आणि नोकरी मागणारे नको, तर देणारे बनावे," असे आवाहन उद्घाटक प्रा. प्रमोद शर्मा यांनी येथे केले.

स्थानिक इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ‘आजीवन शिक्षण व विस्तार विभागा’तर्फे आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन नुकतेच उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



प्राचार्य डॉ. राजपूत होते. यावेळी व्यासपीठावर अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. अशोक पवार, मराठी विभागप्रमुख प्रा. अनिरुद्ध मोरे व उपप्राचार्य व्यंकटेश लांब यांची प्रमुख उपस्थिती होती.

विभागाचे समन्वयक प्रा. जालिंदर अंभोरे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची उद्दिष्टे स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'स्किल डेव्हलपमेंट'चे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. राजपूत यांनी बदलत्या काळात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आत्मनिर्भर होण्याचा सल्ला दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली बिरादार यांनी केले, तर आभार डॉ. जितेंद्र पाटील यांनी मानले.

# नगरजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**कॉलेजकट्टा /आरती सुरवसे :** उरण मधील नगराज शेठ इंटरनॅशनल स्कूलमध्ये उरणशहराचे शिल्पकार तथा उरण नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष दिवंगत नगराज शेठ यांच्या जयंतीनिमित्त प्रतीवर्षा प्रमाणे उरण तालुका मर्यादित चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.स्कूलमध्ये 19 फेब्रुवारी 2026 रोजी शिवजयंती व नगराज शेठ यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त अनेक कार्यक्रम असल्याने सदरची चित्रकलास्पर्धा रविवार दि. 22 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती.उदंड प्रतिसाद मिळालेल्या या चित्रकला स्पर्धांमध्ये उरणमधील अनेक विद्यालयांतील सुमारे 350 विध्यार्थ्यांनी या चित्रकलास्पर्धेत सहभाग घेतला होता.

या चित्रकलास्पर्धांचे उद्घाटन प्रथेप्रमाणे श्री गणेशपूजन व दीपप्रज्वलित करून आर्ट क्रिएशन फाईन आर्टचे संस्थापक श्री रुपेश पाटील सर यांच्या हस्तेकरण्यात आले .यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असणाऱ्या प्रसिद्ध चित्रकार झील आर्ट स्टुडीओच्या संस्थापक चेत्रली ठक्कर,स्कूलचे प्रशासक प्रदीप पाटील सर स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम




उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना चित्रकला विषयक मार्गदर्शन करताना श्री रुपेश पाटील सर म्हणाले की भारतीय संस्कृति मधील 64 कलांपैकी चित्रकलाहीएक पारंपारिक कला हे जी कोणत्याही भाषेचा आधार न घेता एखाद्या प्रसंगाचे वर्णन अचूकपणे सांगू शकते फार पुरातन कालापासून भारतीय चित्रकलेला समृद्ध वारसा लभलेला आहे.पाषाणयुगांतील अजिंठा-वेरूळलेण्यांतील चित्रे उरणातील घरापुरी बेटावरील पाषाणात कोरलेली चित्रे आजही जगप्रसिद्ध आहेत.इतकेच नाहीतर निसर्गाबरोबर नाते जोडणारी ही कला आहे म्हणून वारली सारख्या आदिवासी लोककलांचा यात समावेश आहे.आणि ती जगभरात प्रसिद्ध झालेली आहे.या ठिकाणी मला मनापासून आनंद होतोय कि नगराज शेठ यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्कूलने उरण मधील विद्यार्थ्यांना चित्रकले साठी मोठे व्यासपीठ उभारले आहे.चित्रकलेतूनही चांगले करीयर घडू शकते परंतु अनेक पालकांना हे माहित नसते या सर्वांनी चित्रकलेकडे सकारात्मदृष्टीने पाहणे हि काळाची गरज आहे. आजही अनेकविध्यार्थी चित्रकले साठी उरण मधून मुंबईत जातात उरणात आर्ट क्रिएशन फाईन आर्टच्या माध्यमांतून याठिकाणी आर्टकॉलेज सुरु करण्याचा आमचा मानस आहे. आजयेथेआलेल्या सर्व विद्यार्थ्यांची संख्या पाहता उर्नाठी उत्तम कलावंत असल्याची साक्ष ते देत आहेत मी उपस्थित सर्व स्पर्धकांना यशस्वी होण्या सठी शुभेच्छा देतो त्याक प्रमाणे या स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या साई संस्था संचलित नगराज शेठ इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष नरसू पाटील सर स्कूलचे प्रशासक प्रदीप पाटील सर व स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम यांना धन्यवाद देतोअसे त्यांनी शेवटी सांगितले तर प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध चित्रकार झील आर्ट स्टुडीओच्या संस्थापक चेत्रली ठक्कर,मॅडम यांनी चित्रकले बाबत स्विस्थर माहिती दिली. व सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्र संचलन दृष्टी कोळी मॅडम यांनी केले तर या स्पर्धा यशस्वी करण्या साठी शिल्पा पडवळ मॅडम.नम्रता मॅडम,आरती सुरवसे मॅडम,सुहानी पाटील मॅडम,अंकिता घुमे मॅडम मनाली मॅडम शिक्षकेतरकर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आम्ही मुंबईकर वृत्तपत्राकडून संतोष आमले यांचा गौरव; ‘आदर्श संपादक’ पुरस्काराने होणार सन्मान

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे/विदर्भ संपादिका :** पनवेल पत्रकारिता, साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे दैनिक युवक आधार वृत्तपत्राचे संपादक संतोष शिवदास आमले यांची प्रतिष्ठेच्या ‘आदर्श संपादक’ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा मानाचा सन्मान आम्ही मुंबईकर वृत्तपत्र यांच्या वतीने जाहीर करण्यात आला असून, पत्रकारिता क्षेत्रात ही अत्यंत अभिमानाची आणि गौरवास्पद बाब मानली जात आहे.

संतोष आमले यांनी संपादक म्हणून कार्य करताना समाजातील विविध प्रश्नांना निर्भीडपणे वाचा फोडत जनतेच्या न्यायासाठी सातत्याने आवाज उठवला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, साहित्यिक चळवळी आणि शैक्षणिक जनजागृती यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक सामाजिक विषयांना न्याय मिळाला असून, पत्रकारितेच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची प्रभावी भूमिका त्यांनी बजावली आहे.

पत्रकारितेतील निस्वार्थ सेवा,




साहित्य क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक बांधिलकी याची दखल घेत आम्ही मुंबईकर वृत्तपत्र यांनी त्यांना “सांस्कृतिक आणि साहित्य रत्न पुरस्कार २०२६” सह आदर्श संपादक पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निवडीमुळे पत्रकारिता क्षेत्रात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हा पुरस्कार सोहळा पुणे येथील काकडे देशमुख शिक्षण संस्थेच्या उत्कर्ष इंग्लिश मीडियम स्कूल येथे दिनांक ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संतोष आमले यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि

> **“हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे एक प्रभावी माध्यम आहे. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी आणखी वाढली असून, भविष्यातही समाजातील प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि जनतेच्या हितासाठी निस्वार्थपणे कार्य करत राहणार आहे.”**
>
> **- श्री.संतोष शिवदास आमले**
> **संपादक दैनिक युवक आधार**

गौरवचिन्ह प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

संतोष आमले यांच्या या उल्लेखनीय यशामुळे त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये, पत्रकार बांधवांमध्ये आणि समाजातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे स्थानिक पत्रकारितेला नवी दिशा मिळाली असून, नवोदित पत्रकारांसाठी ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत. समाजहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान होत असल्याने पत्रकारितेच्या मूल्यांना बळ मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा समारोप; पाच दिवसात दोन लाख तीस हजारांहून अधिक नागरिकांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे** : आष्टी येथे दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा आज अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात समारोप करण्यात आला. पाच दिवस चाललेल्या या भव्य कृषी प्रदर्शनाने केवळ आष्टी तालुक्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, उद्योजक, महिला बचत गट, कृषी तज्ज्ञ, विद्यार्थी व नागरिकांना एकत्र आणले. संयोजकांच्या माहितीनुसार, पाच दिवसांत सुमारे २ लाख ३० हजारांहून अधिक नागरिकांनी प्रदर्शनास भेट देत विक्रमी प्रतिसाद नोंदविला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते अभय राजे धोंडे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून व राज्य गीताने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रभावी प्रास्ताविक श्रीराम आरसूळ यांनी केले. संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा. शिवदास विधाते यांनी प्रदर्शनाच्या नियोजनाची, विविध तांत्रिक आणि स्टॉल व्यवस्थापनाची सविस्तर माहिती आपल्या मनोगतातून दिली.

मान्यवरांची उल्लेखनीय उपस्थिती

या समारोप प्रसंगी महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र (राजू काका) धोंडे, आरपीआयचे आष्टी तालुका अध्यक्ष अशोकरावजी साळवे, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पंचायत समिती पाटोदा माजी सभापती अनिल जायभाय, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण, संभाजी जगताप, हरिभाऊ जंजिरे, कुंडलिक आस्वर, व्यवस्थापन मॅनेजर वाबळे सर, युवराज खटके, जिजाऊ मसाले उद्योगाचे प्रमुख बाबासाहेब गर्जे, संस्थेचे प्रशासनाधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, प्रा. सागर वाघुले, प्रा. संदीप नन्नवरे तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीराम आरसूळ, सर्व प्राध्यापक, कर्मचारीवृंद, विद्यार्थी, पत्रकार बांधव व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सतीश आबा शिंदे यांचे प्रभावी मनोगत




माजी जि.प. सदस्य सतीश आबा शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, मोठ्या शहरांतील कृषी प्रदर्शनांना तिकीट घेऊन प्रवेश करावा लागतो; मात्र धोंडे साहेबांच्या संकल्पनेतून आष्टीत शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे.

शेतकऱ्यांना लागणारी आधुनिक कृषी अवजारे, कीड व्यवस्थापन, बीज प्रक्रिया, आंतरमशागत तंत्रज्ञान, सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे तसेच अत्याधुनिक कॅमेऱ्यांद्वारे शेत निरीक्षण यांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात आली. महिलांच्या बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पुढील वर्षी आणखी व्यापक नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी आपल्या भाषणात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव करत आष्टी मतदारसंघ कोरडवाहू असूनही शिक्षण व कृषी क्षेत्रात नवे पर्व सुरू झाल्याचे सांगितले.

प्रदर्शनादरम्यान सुमारे साडेपाच लाख रुपयांच्या मसाल्यांची विक्री झाल्याचे त्यांनी नमूद करत स्थानिक उत्पादकांना मोठी बाजारपेठ उपलब्ध झाल्याचे समाधान व्यक्त केले. जलव्यवस्थापन, आधुनिक ऊस उत्पादन तंत्रज्ञान, जलजीवन मिशन यांसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

राजेंद्र धोंडे यांचे मार्गदर्शन

राजेंद्र धोंडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या प्रदर्शनाने राज्यभरातील शेतकऱ्यांना एकत्र आणले. उद्घाटनानंतर विविध तांत्रिक सत्रे, मार्गदर्शन कार्यशाळा, कृषी तज्ज्ञांचे व्याख्यान, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रदर्शनाची शोभा वाढवली.

कृषी महाविद्यालय आष्टी, प्रशासन अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळे हा उपक्रम यशस्वी झाला, असे त्यांनी नमूद केले.

स्टॉलधारकांचा गौरव

समारोप प्रसंगी सर्व सहभागी स्टॉलधारकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कृषी अवजारे, बियाणे, खते, सेंद्रिय उत्पादने, प्रक्रिया उद्योग, महिला बचत गटांचे स्टॉल, मसाला उत्पादक, तंत्रज्ञान कंपन्या आदी विविध क्षेत्रांतील स्टॉल्सना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊ सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. शेतकऱ्यांसाठी नवी दिशा

डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या कृषी तत्त्वज्ञानाला साजेसा हा उपक्रम शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन वाढ, प्रक्रिया उद्योग, विपणन कौशल्य आणि निर्यात संधी यांची नवी दिशा देणारा ठरला. आष्टी तालुक्यापुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतल्याने हा उपक्रम राज्यस्तरावर आदर्श ठरला आहे.

## हिंगोलीत पोलिस भरती उमेदवारांना विमा संरक्षणाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**हिंगोली प्रतिनिधी/प्रशांत टाकसाळ** : हिंगोली पोलिस चालक भरती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या उमेदवारांना तात्काळ विमा संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी आम आदमी पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाप्रमुख बालाजी भाऊसाहेब देशमुख यांनी यासंदर्भात राज्य सरकारकडे निवेदन सादर केले आहे.



देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यात पोलिस चालक पदाच्या ३२ जागांसाठी तब्बल १३ हजार उमेदवारांनी ऑनलाइन डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून अर्ज दाखल केले आहेत. जनरल प्रवर्गासाठी ४५० रुपये तर इतर प्रवर्गासाठी ३५० रुपये शुल्क आकारण्यात आले असून, या प्रक्रियेतून अंदाजे ४५.५ लाख रुपयांची रक्कम प्रशासनाकडे जमा झाली आहे. इतकी मोठी रक्कम उमेदवारांकडून स्वीकारली जात असताना त्यांच्या सुरक्षिततेसाठी विमा संरक्षणाची तरतूद का करण्यात येत नाही, असा सवाल देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

यापूर्वी बीड आणि छत्रपती संभाजीनगर येथे भरती प्रक्रियेदरम्यान धावण्याच्या चाचणीत सहभागी झालेल्या काही उमेदवारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक उमेदवाराचा डिमांड ड्राफ्ट स्वीकारल्यानंतर तात्काळ विमा उतरवूनच पुढील भरती प्रक्रिया राबवावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

तसेच, मृत उमेदवारांच्या कुटुंबीयांना तात्काळ २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. भरतीच्या ठिकाणी शासनाकडून पाणी, अल्पाहार व स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असताना त्या पुरविण्यात आल्या नसल्याचा आरोप करत आपच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.सदर निवेदन देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री व गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात आले असून, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रशिक्षणाने महिलांच्या नाकामध्ये सजली उमेदची नथ

**दैनिक युवक आधार**
**सणसर /विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे भवानीमातेच्या मंदिरात बँक ऑफ महाराष्ट्र पुरस्कृत ग्रामीण महिला व बालक विकास मंडळ आणि महाराष्ट्र शासनाच्या उमेद अभियानांतर्गत स्थापन झालेल्या कल्पवृक्ष महिला ग्रामसंघाच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी ज्वेलरी मेकिंगचे एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रशिक्षणा दरम्यान महिलांना



नथ,मोत्याची माळ,कुंडल अशा तब्बल 11 प्रकारच्या दागिन्यांची प्रत्यक्ष डेमो करून माहिती देण्यात आली. प्रशिक्षक स्वाती थोरे आणि सुचित्रा फडतरे यांनी महिलांना कौशल्यपूर्ण मार्गदर्शन केले.


विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या मोत्याच्या नथी नाकामध्ये परिधान केल्यावर त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाल्याचे दृश्य उपस्थितांना भावले.महिलांच्या चेहऱ्यावर उमेद आणि आनंदाची झळाळी स्पष्टपणे दिसून आली.

या कार्यक्रमासाठी ग्रामीण महिला व बालक विकास मंडळाच्या तालुका व्यवस्थापिका निलम जाधव, उमेदच्या तालुका व्यवस्थापिका राणी ननवरे,ग्रामसखी कामिनी चव्हाण, बँक ऑफ महाराष्ट्रच्या भुजबळ मॅडम,बँक सखी फातिमा शेख,महेश काळे तसेच अनेक महिला उपस्थित होत्या.

या प्रशिक्षणामुळे महिलांना केवळ दागिन्यांची निर्मिती शिकण्याची संधी मिळाली नाही,तर आत्मनिर्भरतेचा मार्गही खुला झाला.उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या जीवनात आत्मविश्वासाची नथ सजली आहे असं मत सणसर ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या आणि ग्रामसखी सौ.कामिनी चव्हाण यांनी मांडले.

## शेळी येथील रस्त्यावर खड्डे,नागरीक आंदोलनाच्या पवित्र्यात; अंतरातही गौडबंगाल,निकृष्ट कामामुळे गावकरी त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी** : कोपरी ते शेळी या ३ की.मी.रस्त्याची हालत २ वर्षातच खस्ता झाली आहे.शासकीय तिजोरीतून करोडो रुपये खर्च करून करण्यात आलेल्या या रस्त्याची अवस्था अवघ्या तीन वर्षांतच अत्यंत दयनीय झाली आहे."दहा वर्षे टिकेल"असा दावा करणाऱ्या कंत्राटदाराचा आणि प्रशासनाचा दावा पावसाळ्यातील पहिल्या काही सरींचा फोल ठरवला असून, सध्या या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत.शेळी येथील नागरिकांचा संताप टोकाला पोहचला आहे, ग्रा.पंचायने रीतसर याची दखल घेतली असून स्वप्नील वटाणे यांनी याची वारंवार तक्रार करून ही प्रशासन दिशाभूल करत असल्याचा आरोप होत आहे .विशेष म्हणजे फलकावर दाखवलेले रस्ता बांधकाम व प्रत्यक्ष रस्ता बांधकाम यात देखील तफावत असल्याचा



गंभीर आरोप करण्यात आला आहे .

दोन वर्षांपूर्वी मोठ्या गाजावाजात या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले होते. मात्र,आज या रस्त्याची अवस्था 'खड्डे की खड्यात रस्ता?' अशी झाली आहे. विशेषतः कोपरी पासून ते शेळी पर्यंतच्या पट्ट्यात रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले असून खालची खडी वर आली आहे. यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.वापरलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याने रस्ता लवकर खराब झाला. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना पाठीचे आणि मणक्याचे आजार जडत आहेत.आमच्या कराच्या पैशातून हे रस्ते बनवले जातात, पण तीन वर्षातच जर अशी अवस्था होत असेल, तर या कामाची चौकशी व्हायलाच हवी. संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी.अशी मागणी शेळी येथील नागरिक करत आहे .

**शेळी येथील रस्ता अल्पावधीत खराब झाला .विशेष म्हणजे या रस्त्यावरून कोणतीही जड वाहने जात नाही .रेती घाट या मार्गावर नाही .केवळ ऑटो व दुचाकी वाहतूक होते ,असे असताना ही हा रस्ता ठिकठिकाणी उखडून गेला आहे,सर्वात गंभीर बाब म्हणजे फलकावर दाखवलेले काम व प्रत्यक्ष रस्ता यात अंतराचा मोठा घोळ आहे,याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांशी संपर्क साधला असता,टोलवाटोलवी करण्यात येत आहे,तक्रार केली त्याला दिशाभूल करणारे उत्तर दिल्या गेले,वारंवार मागणी करूनही इस्टिमेट दिल्या जात नाही,काय लपवायचे आहे समजण्यास मार्ग नाही,हा विषय शेळी रस्त्यापुरता मर्यादित नाही,जळका रस्त्याचीही तक्रारी आहेत ,तालुक्यात निकृष्ट रस्ते बांधकामांची मोठी शृंखला निर्माण झाली आहे,आम्ही गप्प बसणार नाही,याच्या मुळाशी जाऊन जनतेच्या पैशाला कुणाच्या तरी घशात घालणाऱ्यांना वठणीवर आणू,मुख्य रस्ता वारंवार होत नसतो,सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम संशयास्पद आहे,तशीच वेळ आली तर गावकरी आंदोलन करतील.**

**स्वप्नील वटाणे;शेळी**

## बेलवाडी गाव समस्यांसाठी सौ.माधुरी सागर भिसे यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर लासुर्णे जिल्हा परिषद सदस्या सौ.माधुरी सागर भिसे यांनी बेलवाडी गावातील विविध समस्या जाणून घेण्यासाठी भेट देण्यात आली.गावातील पाणीटंचाई,रस्त्यांची दुरवस्था,शाळेतील सुविधा,तसेच आरोग्य केंद्रातील अपुऱ्या सोयी स्मशान भूमी याबाबत सरपंच सौ.मयुरीताई शरद जामदार तसेच ग्रामस्थांनी त्यांच्यासमोर विविध अडचणीची मांडणी केली. सौ माधुरी भिसे व सौ.निर्मला मिसाळ यांनी प्रत्यक्ष स्थळांना भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला आणि समस्यांचे बारकाईने निरीक्षण केले.

यावेळी ग्रामस्थांनी बेलवाडीतील पाणीपुरवठा सुरळीत करण्याची,रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची, तसेच शाळा व आरोग्य केंद्रासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.सौ माधुरी भिसे यांनी ग्रामस्थांना आश्वासन



दिले की या सर्व समस्या संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील.त्यांच्या भेटीमुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी श्री छत्रपती सह.सा.कारखान्याचे संचालक शरद जामदार सागर मिसाळ बेलवाडी गावचे उपसरपंच सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाच्या जिल्हा महामंत्रीपदी संदीप पेंदोर यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती मोर्चा, यवतमाळ जिल्हा कार्यकारिणीत महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली असून, संदीप पेंदोर यांची जिल्हा महामंत्री तसेच विधानसभा राळेगाव प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.ही नियुक्ती ॲड.जिल्हाध्यक्ष प्रफुलसिंह चौहाण, जिल्हा




महामंत्री राजू पडगीलवार,रेखा कोठेकार,राजीव पुंडलिकवार तसेच अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिलीप मलांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली.

## २० वर्षाच्या काळापासून सुरू असलेली हिंगणघाट यवतमाळ येवती मार्ग बस पूर्वता सुरू करा

**दैनिक युवक आधार**
**विदर्भ संपादिका/ज्योत्स्ना करवाडे** : कोरोना काळात राज्यातील बस वाहतूक पूर्ण बंद होती.कोरोनाचा प्रादूर्भाव संपल्यानंतर लगेचच एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ आणि महामंडळाचे सरकारमध्ये विलीनीकरण करण्यासाठी दीर्घ काळ संप पुकारला. दरम्यान सहा महिन्यांच्या काळात राज्यातील जनता बेहाल झाली होती. कालांतराने पगारवाढ झाल्याने हा संप मागे घेतला.मात्र,तेव्हापासून विस्कळीत झालेली बससेवा अद्याप सुरळीत झालेली नाही.खेड्यांमध्ये सध्या खासगी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत असून केवळ आठवडी बाजाराच्या दिवशी ही सुविधा उपलब्ध असते. त्यामुळे आजारी,वयोवृद्ध नागरिकांना पुरेशा आरोग्य सुविधाही मिळणे कठीण झाले आहे.शाळा,महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत असून प्रचंड खर्च करून खासगी वाहतुकीने परगावी जागे लागत आहे. खासगी बस वाहतुकीवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नसल्याने वारेमाप लूट सुरू आहे. तर खेडोपाडी सुरू असलेल्या फेऱ्या तोट्याच्या नावाखाली बंद केल्याने ग्रामीण भागात प्रचंड हाल सुरू आहेत.देशातील सर्वोत्कृष्ट महामंडळाचा सर्वाधिक पतनाचा काळ सध्या सुरू असून



गेल्या पाच वर्षांत ते वेगाने सुरू आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रवासासाठी कधीकाळी सेवेस तत्पर असलेली एसटी महामंडळाची बस सध्या खेड्यापाड्यातून गायब झाली आहे.तर लांब पल्ल्याच्या मार्गावर एसटी बसेसऐवजी खासगी बस धावत आहेत.

गेल्या दोन-अडीच वर्षांत राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पूर्ण बट्ट्याबोळ झाला असून,त्याकडे लक्ष देण्याऐवजी दरवाढ करून जखमेवर मीठ चोळले आहे.चहांद परसोडा,येवती,धानोरा, वनोजा,चिखली,अंतरंगाव,कोपरी या सर्व गावांना धान्य व इतर मार्केट आणि शाळा महाविद्यालये असल्याने लांब वरून प्रवास करावा लागत आहे,कोरोना काळापासून बंद असलेल्या किंवा तोट्याचे कारण सांगून बंद केलेल्या अनेक एसटी महामंडळ बसेस पूर्ववत चालू कराव्यात,अशी मागणी ग्रामीण भागातील प्रवासी,विद्यार्थी आणि सर्व गावातील ग्रामस्थांनी केली आहे.

**‘एसटीचा प्रवास, सुरक्षित प्रवास’ असे घोषवाक्य होते. विनाअपघात प्रवास आणि महिला सुरक्षेसाठी ओळख असलेली बससेवाच बंद झाल्याने राज्यातील महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सायंकाळच्या टप्प्यात महाविद्यालयातून घरी जाणाऱ्या मुलींना पायी जावे लागत आहे. तर रात्री उशिरा परतणाऱ्या महिला आणि मुलींना जीव मुठीत घेऊन पायपीट करत घर गाठावे लागत आहे.**

**जितेंद्र खोडे (वनोजा) ग्रामस्थ**

# अनुसूचित जमातीच्या मुला/मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील मुला मुलीना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून "परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबवली जात आहे या योजने अंतर्गत सन 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी 40 गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसुचित जमातीच्या 40 विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्ती मध्ये शिक्षण व परिक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक/ इतर खर्च विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे. शैक्षणिक आकस्मिक खर्च, युएएस व इतर देशांसाठी (यूके वगळून) | 1500 यूएस डॉलर तर युकेसाठी 1100 जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल.

लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा 8.00 लाख रुपये तसेच विद्यापीठाची क्युस वर्ल्ड रेंकिग मर्यादा 200 च्या आत आसने बंधनकारक आहे विहीत निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांना कुटुंबाची उत्पन्न मर्यादा रुपये 10 लाख पर्यंत शिथिल केली जाईल तर क्यूस वर्ल्ड रैंकिंग मर्यादा 200 पासून पूढे चढत्या क्रमाने 300 पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल, परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक TOEFL किवा IELTS यासारख्या प्रवेश परिक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे दरम्यान, शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठों विहीत नमुन्यातील आवेदन https:fs. maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे अनिवार्य आहे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील निवड समितीव्दारे निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाईल योजनेच्या अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळावर भेट देण्यात यावी

सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात सदर योजनेचा अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन... प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी, जि.गोंदिया यांनी केले आहे.

# पालक-शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या बैठकीत कॉपीमुक्त अभियानाचे स्वागत

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** पाटोदा येथील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये नुकतीच पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची वार्षिक शैक्षणिक बैठकीचे आयोजन केले होते. विविध शैक्षणिक विकासावर आधारित सदर बैठकीचे निमंत्रण शाळेच्या प्रायमरी प्राचार्या सीमा माळी मॅडम यांनी पालकांना लेखी (ऑनलाईन) पत्र आणि दूरध्वनी वरून पालकांना शंभर टक्के उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले होते. सदर निमंत्रण स्वीकारून सर्वच पालक शिक्षक संघाच्या पालकांनी शंभर टक्के उपस्थिती दर्शविली होती. सदर शैक्षणिक बैठक शाळेचे प्राचार्य पठाण सर, यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. या वेळी सायन्स आणि इंग्लिश विषयाच्या सह शिक्षिका आणि दहावी बोर्ड परीक्षा प्रमुख वसुंधरा एकबोटे मॅडम, गणित विषयाचे तज्ञ मार्गदर्शक कांतिलाल घोलप सर, मराठी विषयाचे प्रमुख सावंत सर, इयत्ता ९ वी चे दहावीत जाणारे सर्व विद्यार्थी आणि शिक्षक पालक संघाचे सर्व पालक सदस्य आपल्याला विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बैठकीस घेऊन उपस्थित होते. या वेळी पालकांना मार्गदर्शन शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री सावंत सर, गणिताचे प्रमुख कांतिलाल घोलप सर, वसुंधरा मॅडम यांनी सविस्तरपणे अभ्यासक्रमावर आधारित दर्जेदार शिक्षण आमची शाळा देत असून, पालकांनी आपापल्या शाळेचे आणि शिक्षणाचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे आहे असे सांगितले. तसेच सर्वच विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेला उपस्थिती दर्शविली पाहिजे असे आवाहन केले, विद्यार्थ्यांना सतत उपस्थिती मुळे शिस्त लागते आणि विद्यार्थी जास्त अभ्यास करतात असे सांगितले. विज्ञान गणित आणि इंग्लिश या विषयांचा अभ्यास सतत करावा लागतो आणि भाषा विषयाचा पूर्ण अभ्यास केल्यानेच विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत असतात असा आमचा वीस वर्षाचा अनुभव असल्याचे सांगितले. या वेळी सर्व पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी ही शाळेला शंभर टक्के उपस्थिती राहून, सतत अभ्यास करण्याची हमी दिली. यावेळी आपापल्या मुलांना सर्वच पालक शालेय शिस्त, वेळेवर अभ्यास करणे, गैरहजर ना राहणे या बाबतीत प्रोत्साहन देतील असे आश्वासन दिले. सध्या चालू असलेल्या बोर्ड परीक्षा संबंधी माननीय जिल्हाधिकारी साहेब बीड आणि शिक्षण विभागाच्या कॉपीमुक्त परीक्षा अभियानाचे स्वागत करून, या पुढे आपले विद्यार्थी, पालक आणि कोणीही शिक्षक कसल्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही असा संकल्प करण्यात आला. या पालक शिक्षक बैठकीसाठी, शाळेचे शिक्षक अर्जुन सानप सर, कृष्णा सानप सर, आणि शाहीद सर यांनीही खूप परिश्रम घेतले. या बैठकीत विविध शैक्षणिक उपक्रम वर चर्चा झाली, पालकांनी शालेय शुल्क वेळेवर भरणे गरजेचे आहे. ते सर्वांनी मान्य केले. या वेळी अभ्यासक्रमातील विविध विषयाचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करून विद्यार्थ्यांची मुख्य परीक्षा साठी जास्तीची पूर्व तयारी शाळेने करून घेण्यावर भर देण्यात आला. या वेळी अध्यक्ष स्थानी असलेले प्राचार्य पठाण सर यांनी वर्षभरातील विद्यार्थ्यां संबंधीची शालेय शिस्त, वक्तशीरपणा, अभ्यासाची सतत ची सवय लावण्याची जिम्मेदारी सर्वच पालकांची आणि शाळेत सर्वच विषय शिक्षकांची असल्याचे सांगितले. पालकांनीही वर्षभरात विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी होणाऱ्या बैठकीस वेळ काढून आवर्जून उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयाच्या अडचणी असल्यास शिक्षका सोबत सुसंवाद करणे आवश्यक आहे असे सांगितले. पालकांनी सतत होणाऱ्या शालेय बैठकीस हजर राहिल्यास विद्यार्थ्यांना पालकांची आणि शिक्षकांची आदरयुक्त आणि अभ्यासयुक्त प्रेरणा मिळते, आणि त्यामुळे मुलांना कॉपी करण्याचा विचार कधीच येणार नाही असे सांगितले. हुशार विद्यार्थांचे भविष्य नेहमी उज्वल असते म्हणून आपले सर्वच विद्यार्थी गुणवान असून, या पुढे ही फक्त बोर्डच्या परीक्षेलाच नाही तर कोणत्याही वर्गाच्या आणि स्पर्धा परीक्षा साठी कोणीच गैरमार्गाचा वापर करायला नको असे सर्वांना आव्हान केले. प्राचार्य आणि सर्व शिक्षकांच्या आव्हानाला सर्व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी पालकांनीही अभ्यासविषयी विविध प्रश्न विचारले त्यांच्या प्रश्नांना शिक्षकांनीही अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. आणि विद्यार्थांच्या प्रगतीसाठी आम्ही नेहामीच कटिबद्ध राहू असे सांगितले, या वेळी पालकांचे आभार सावंत सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी झाल्याने सर्वच पालक, शिक्षक आणि विद्यार्थी आनंदीत होते. सर्वांनी विविध केलेले संकल्प शंभर टक्के यशस्वी करण्याचे ठरवले.

# अपक्ष संचालक रजनीकांत बोरेले यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्त महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधि/पांढरकवडा** : येथील रजनीकांत डालूरामजी बोरेले व्हिसल ब्लोअर आणि अपक्ष संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या तर्फे कृषी उत्पन्न बाजार समिति येथे एकांतेश्वर शिवलिंग आणि हनुमानजी यांचा मंदिर आहे.या शिवाल्यात महा शिवरात्रीच्या दिवशी रजनीकांत बोरेले यांच्या कडून मोठ्या उत्साहने शिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला होता.मोठ्या उत्सावाने या ठिकाणी शिवरात्री साजरा करण्यात आला होता.दुसऱ्या दिवसी बोरेले कडून जेवनाचा प्रसाद दरवर्षी ठेवल्या जाते परंतु शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता झारखंड च्या रजरप्पा येथील आई छिंद मस्तिकचे दर्शन करीता गेले तेथून देवघर बैजनाथ धाम दर्शन घेवून पुढे बिहार राज्यातुन गयाजी ते उत्तर प्रदेशच्या काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग आणि गंगाजी दर्शन घेवून मध्ये प्रदेश वरुण महाराष्ट्रतील





पांढरकवडा येथे दि.२०/०२/२०२६ ला पहाटे आले त्यामुळे शिवरात्रीला महाप्रसाद दिनांक २१/०२/२६ रोजी ठेवण्यात आला तदपुर्वी शिवलिंग महादेव आणि हनुमानजी यांची पूजा अर्चना करुण नैवेद्य अर्पण करुण आरती करुण प्रसाद ला प्रारंभ करण्यात आले.

या वेळी अनेक शिव भक्त आणि महिला भगतांनी जेवन प्रसादचा आस्वाद घेतला आहे.यावेळी रजनीकांत बोरेले बंधु लक्ष्मीकांत बोरेले,(बोरेले), सुपुत्र सर्वम रजनीकांत बोरेले,,काका राजू बोरेले, विशाल बोरेले, पुतने बंटी बोरेले यांच्या सह बोरेले परिवार उपस्थित होता यावेळी ब्राह्मण भोजन नंतर पवन महाराज शर्मा,जय पंचोली, शुभम केलापुरे,कुणाल बड़सर, दर्शन माटोलिया यांना रजनीकांत बोरेले यांचे हस्ते वस्त्र, दक्षिणा देवून त्यांचे सन्मान करण्यात आले,या वेळी प्रतिष्ठित व्यापारी प्रमोद भूत,आनंद चोपड़ा, गणेश सिंघानिया,अर्जुन पाटिल, गुंटु धादौड,गणेश हटकर, राजू कैटिकवार,महेश आदेवर,पवन शंकर अक्केवार, मोरेश्वर डेहनकर,ललित सिंघानिया,स्मित झाजरीया,अक्षय पीपलवा,भालचन्द्र मडावी,गणेश कस्तूरवार,राजू भंडारवार,दिनेश कस्तूरवार,आतीष गेडाम, पार्बता मुळे,दत्ताढाले,गजु रुखमावार आणि शेतकरी वर्ग यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिति लाभली होती.

# सिनेस्टार अमीर खान यांच्या पाणी फाउंडेशनचे शेतकरी वॉटर कप स्पर्धा प्रशिक्षण राळेगणसिद्धी येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : पाणी फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित शेतकरी वॉटर कप स्पर्धेचे प्रशिक्षण राळेगणसिद्धी (अहिल्यानगर) येथे उत्साहात संपन्न झाले. या प्रशिक्षणासाठी पाटोदा तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलसंधारण, मृद व जल व्यवस्थापन, श्रमदानाचे महत्त्व आणि गाव पातळीवर पाणी साठवणुकीचे प्रभावी नियोजन या बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समिती चे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, विंचरणा




शेतकरी उत्पादक कंपनीचे मोहन सोनवणे, पत्रकार हरीदास शेलार, सहकार अधिकारी कुलदीप काळे सह इतर शेकडो शेतकरी उपस्थित होते. प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांमध्ये जल संवर्धनाबाबत नवी ऊर्जा निर्माण झाली असून, वॉटर कप स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याचा निर्धार या वेळी पाटोदा तालुक्यातील सर्व उपस्थित शेतकरी व पदाधिकारी यांनी व्यक्त केला. विशेष बाब म्हणजे या प्रशिक्षणादरम्यान जेष्ठ समाजसेवक आण्णा हजारे आणि आदर्श गाव कार्यसमितीचे अध्यक्ष हिवरेबाजार चे आदर्श सरपंच पोपटराव पवार यांची भेट हि एक आशावादी व प्रेरणेने ऊर्जा निर्माण करणारी ठरली. पाटोदा तालुका हा कायम दुष्काळी व पर्जन्यमान जास्त होऊन सुद्धा पाण्याची साठवण क्षमता उदा. साठवण तलाव, बॅरेज, कॅनॉल हे सर्व शेतकरी बांधवांना नसल्याने कोरडवाहू क्षेत्र जास्त असून कायम शेतीच्या मुख्य प्रवाहापासून दुर आहे. बॉलीवूडचे प्रसिद्ध सिनेस्टार आमिर खान यांच्या या पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून येणाऱ्या काळात पाटोदा तालुक्यांमध्ये एक चांगले काम उभारले जाईल असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

# ग्राम पांगरी नवघरे येथे युवकांना नेतृत्व व संविधानाचे बळ; आशिष धोंगडे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन, युवकांमध्ये नवा आत्मविश्वास

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्राम पांगरी नवघरे येथे "नेतृत्व विकास व संविधानिक मूल्ये" या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. युवकांमध्ये सक्षम नेतृत्व निर्माण करणे आणि संविधानिक मूल्यांची भक्कम पायाभरणी करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अनुभव शिक्षा केंद्र अमरावती अंतर्गत वाशिम जिल्हा प्रशिक्षक आशिष धोंगडे उपस्थित होते. त्यांनी युवकांना मार्गदर्शन करताना ठामपणे सांगितले की, नेतृत्व म्हणजे केवळ




पद किंवा प्रतिष्ठा नसून ती समाजाप्रती असलेली जबाबदारी, प्रामाणिकपणा आणि बांधिलकी आहे. युवकांनी प्रभावी संवादकौशल्य, निर्णयक्षमता, संघभावना आणि सामाजिक जाणीव विकसित केल्यास ते समाजाचे सक्षम नेतृत्व करू शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

संविधानिक मूल्यांवर भाष्य करताना त्यांनी भारतीय संविधान हे प्रत्येक नागरिकासाठी समानतेचे, स्वातंत्र्याचे, बंधुतेचे आणि न्यायाचे सर्वोच्च मार्गदर्शक असल्याचे अधोरेखित केले. युवकांनी या मूल्यांचे केवळ ज्ञान न घेता त्याचे आचरण करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणावे, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. दिपक जमदाडे, सहाय्यक अधिकारी प्रा. भिमराव जांभरुणकर, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. लता खडसे तसेच सर्पमित्र गोपाल बोरचाटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी युवकांना सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून नेतृत्वगुण विकसित करण्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी अनुभव शिक्षा केंद्राच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि नेतृत्व विकास उपक्रमांची माहिती देण्यात आली. युवकांनी या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन समाज परिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला ग्रामस्थ व स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरला असून, भविष्यात सक्षम, जागरूक आणि संविधाननिष्ठ नेतृत्व घडविण्यासाठी अशा कार्यक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# मादळमोही येथे शिवजयंतीनिमित्त आनंद अनुभूती शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मादळमोही/प्रतिनिधी** : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने आयोजित आनंद अनुभूती शिबिर मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडले. शिवरायांच्या पराक्रम, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेच्या प्रेरणादायी विचारांना उजाळा देत ग्रामस्थांनी ध्यान, प्राणायाम व सकारात्मक जीवनमूल्यांचा अनुभव घेतला. शिबिरामध्ये सहभागी नागरिकांना दैनंदिन ताणतणावातून मुक्त होण्यासाठी सोप्या श्वसनक्रिया, ध्यानपद्धती आणि आनंदी जीवनशैलीचे मार्गदर्शन करण्यात आले. "स्वराज्य ते सुराज्य" हा संदेश देत आत्मविश्वास, शिस्त आणि समाजसेवेची प्रेरणा देण्यात आली. या शिबिरासाठी प्रशिक्षक देव गोसकी, आदिनाथ गावडे व माऊली दोबोले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वयंसेवक गणेश



यादव, शिवाजी काचोळे, अर्जुन गावडे,माऊली आखाडे, तुकाराम पायघडे, भागवत केकरे, अनंत अडाणे, अजय बिर्ला, दिलीप पवार, महादेव जगताप व अंगद मोहिते यांनी मोलाची सेवा बजावली.

पुढील आनंद अनुभूती शिबिर दि.9 ते 13 मार्च 2026 दरम्यान आयोजित करण्यात येणार असून इच्छुकांनी लवकरात लवकर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शिबिर आनंद, उत्साह आणि अध्यात्मिक ऊर्जा यांचा सुंदर संगम ठरले.

# महाराष्ट्राच्या मातीतील हिरोंचा सन्मान : मे मध्ये 'महाराष्ट्र नायक' पुरस्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**

**सिद्धार्थ धंदरे/चिखली तालुका प्रतिनिधी** : बी एस एफ बहुद्देशीय संस्था, समाज प्रतिबिंब बहुद्देशीय संस्था व उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे नाशिक मध्ये मे महिन्यात भव्य दिव्य असें कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र नायक पुरस्कारार्थी यांच्या जीवनाची माहिती देणारं, त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगणार पुस्तकं वितरित करण्यात येणारं आहे. पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी प्रमाणपत्र,पुस्तकं असें राहिलं.



पुरस्कार सोहळा आयोजन समिती (नाशिक)

पुस्तकाचे नावं-टाळ्या थांबतात, संघर्ष चालू राहतो असें आहे. पुरस्कार सोहळा कार्यक्रम उद्देश कर्तृत्ववान लोकांचा सन्मान आणि सन्मानातून वृद्धाश्रम उभारणे हा आहे. अधिक माहितीसाठी कार्यक्रम मुख्य आयोजक भूषण सरदार 9420621994 वर संपर्क करावा. महाराष्ट्र नायक पुरस्कार सोहळा आयोजन समिती मधीलपत्रकार रामभाऊ आवारे,पत्रकार मुकुंद आव्हाड,पत्रकार डॉ. शाम जाधव, पत्रकार अश्विनी पुरी, पत्रकार सिद्धार्थ धंदरे.पत्रकार विष्णू गायकवाड,राजनंदिनी अहिरे,वैशाली सोनवणे,कु. अश्विनी सांगळे,शिक्षिका प्रीती म्हसदे,शंकरराव कन्हेरकर,संजय पाटील,पत्रकार संजय बच्छाव,डॉ. रावसाहेब घोडेराव,योगिता दांडगे,शिक्षक दादाराव सुखधाने,पत्रकार रोशन गव्हाणेशिक्षक सोपान वाघमारे, पत्रकार सुरेखा गांगुर्डे, जयश्री बसते,मनिष मुथा, देविदास सोनवणे सम्पूर्ण आयोजन समिती मेहनत घेत आहे.

# घाणीचे साम्राज्य आणि नहरात साचलेले पाणी ; प्रशासन झोपेतच

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा** : लाखनी तालुक्यातील केसलवाडा / फाटा परिसरातील नहरात मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिले असून त्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून नहरातील पाणी वाहून न गेल्यामुळे ते सडू लागले असून डास-माशांची उत्पत्ती वाढली आहे. परिणामी मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नहराची नियमित साफसफाई व पाण्याचा निचरा न केल्यामुळे ही समस्या गंभीर बनली आहे. नहराच्या काठावर घाण व कचरा साचल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. आसपास राहणाऱ्या व्यवसायिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने त्वरित नहराची साफसफाई करून साचलेल्या पाण्याचा निचरा करावा, तसेच परिसरात फवारणी करून रोगराईचा धोका टाळावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भवन येथे २९ वर्षांनंतर रंगला '९७ च्या बॅचचा स्नेहमेळावा

## सिद्धेश्वर हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून गुरुजनांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :-** "शाळा सुटली, पाटी फुटली..." असे म्हणत आयुष्याच्या प्रवासात पांगलेले सवंगडी तब्बल २९ वर्षांनंतर पुन्हा एकदा आपल्या शाळेच्या अंगणात एकवटले. निमित्त होते, सिल्लोड तालुक्यातील भवन येथील सिद्धेश्वर हायस्कूलमधील सन १९९७ च्या दहावीच्या बॅचच्या स्नेहमेळाव्याचे. रविवारी पार पडलेल्या या मेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा देताना माजी विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते.प्रदीर्घ काळानंतर एकमेकांना पाहिल्यावर आनंदाश्रू आणि हास्याची कारंजी एकाच वेळी पाहायला मिळाली. शालेय जीवनातील तो निरागस काळ, गुरुजींचा धाक आणि कट्ट्यावरच्या गप्पांचा पट या मेळाव्यात पुन्हा एकदा उलगडला गेला. प्रारंभी सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची




सुरुवात करण्यात आली.ज्या शिक्षकांनी जीवनाचा पाया रचला, त्या गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी शिक्षक प्रकाश जोगदंड, प्रमोद सुरडकर, पितांबर अकाते, प्रवीण बराटे, श्रीराम सोनवणे आणि शिक्षिका सुनंदा तायडे यांचा शाल व श्रीफळ देऊन भावूक वातावरणात सत्कार करण्यात आला. "आज आम्ही समाजात ज्या सन्मानाने जगत आहोत, त्यामागे या गुरूंचे संस्कार आहेत," अशा शब्दांत रामदास साळवे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

केवळ एकत्र येऊन आनंद साजरा करणे इतकाच या मेळाव्याचा हेतू नव्हता, तर आपल्या शाळेसाठी काहीतरी ठोस कार्य करण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला. आगामी काळात शाळेच्या प्रगतीसाठी आणि गावातील सामाजिक कार्यासाठी ही बॅच सक्रिय राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी तुकाराम कांडे, एकनाथ जंजाळ व १९९७ च्या बॅचमधील सर्व मित्र-मैत्रिणींनी परिश्रम घेतले.

# पळस्पे येथे महामार्ग सुरक्षा पथकाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन

## अप्पर पोलीस महासंचालक प्रवीण साळुंखे यांच्या हस्ते देवदूत स्वयंसेवकांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**खालापूर;संतोष शेवाळे :** रस्ते सुरक्षा अभियान २०२६ च्या समारोप कार्यक्रमानिमित्त रायगड परिक्षेत्रातील महामार्ग सुरक्षा पथकाच्या पळस्पे येथील नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य प्रवीण साळुंखे यांच्या हस्ते फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

रायगड परिक्षेत्रात वाढती वाहतूक, सातत्याने घडणारे अपघात आणि प्रशासकीय अडचणी लक्षात घेता स्वतंत्र प्रशासकीय कार्यालयाची गरज भासत होती. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाची जागा निश्चित करून अतिक्रमण हटवले व आवश्यक प्रशासकीय पाठपुरावा पूर्ण करत हे कार्यालय उभारण्यात यश मिळवले. या उपक्रमामुळे महामार्ग सुरक्षा व्यवस्थेला स्वतंत्र व सक्षम अधिष्ठान प्राप्त झाले




आहे.

या कार्यालयामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी,वाहतूक नियमन व सातत्यपूर्ण देखरेख, ई-चलान प्रणालीची काटेकोरपणे राबवता येईल, अपघात नियंत्रण व तात्काळ मदत व्यवस्थेचे बळकटीकरण होईल.

कार्यक्रमात अपघातग्रस्तांना मदत करून जीवनदान देणाऱ्या 'देवदूत' स्वयंसेवकांचा, हेल्प फाउंडेशन, सह्याद्री वन्यजीव संरक्षक समिती अशा सामाजिक संस्थां, महामार्गावरील देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पिटल, डेल्टा फोर्स, मृत्युंजय देवदूत यांच्यासह कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, पत्रकार, उद्योजक, वाहतूकदार आणि नागरिकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अपघाताच्या क्षणी तत्परतेने धावून जाणाऱ्या या मदतनीसांमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपअधीक्षक पुष्पलता दिघे, पोलीस निरीक्षक भरत शेंडगे, विनोद माळवे, दिपाली जाधव, वैभव रोंगे, पीएसआय देविदास नाईक, पीएसआय संजय टिळेकर तसेच जिल्ह्यातील महामार्ग पोलीस अधिकारी, कर्मचारी, कंटेनर यार्ड प्रतिनिधी, वाहतूकदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पळस्पे येथील नूतन प्रशासकीय कार्यालयामुळे रायगड परिक्षेत्रातील महामार्गांवरील शिस्त, सुरक्षितता आणि प्रतिसाद क्षमता अधिक सक्षम होणार आहे.

महामार्ग सुरक्षा यंत्रणेचे बळकटीकरण आणि स्थानिक पातळीवरील समन्वय यांचा संगम साधत "सुरक्षित प्रवास – सुरक्षित जीवन" ही संकल्पना प्रत्यक्षात साकारेल असा मनोदय यावेळी व्यक्त होत होता.

# टायर ट्यूबमध्ये दडवलेली अवैध दारू व वाहन जप्त;गुन्हा अन्वेषण पथकाची धडाकेबाज कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**खालापूर /संतोष शेवाळे :** खालापूर तालुक्यात अवैध दारूची टायर ट्यूबमधून होत असलेली तस्करी उघड करत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. ट्यूबमध्ये चलाखीने दारू भरून चारचाकी वाहनातून वाहतूक केली जात असताना पोलिसांनी सापळा रचून आरोपीला जेरबंद केले.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल,अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे तसेच स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार रणजीतसिंह खराडे यांना मिळालेल्या




गोपनीय माहितीनुसार तात्काळ पथक तयार करण्यात आले. पोलीस हवालदार खराडे यांना मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार खालापूर तालुक्यात मौजे कुंभीवली येथे एका संशयित वाहन अडवून झडती घेण्यात आली असता टायर ट्यूबमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध दारू साठवून वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले.या कारवाईत ट्यूबमध्ये भरलेली २४,०००/-रुपये किमतीची २४० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू तसेच ९५,०००/-किमतीचे वाहन क्रमांक MH 06 AB.7517 टाटा कंपनीची इंडिका डीलक्स वाहन असे एकूण१,१९,०००/ रुपये किमतीचा असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी दिनेश नारायण नरे (वय५२) राहणार वरने तालुका कर्जत जिल्हा रायगड यास ताब्यात घेऊन खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर 60/2026 महाराष्ट्र दारूबंदी अधि नियम 1949 चे कलम (65) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून यापुढील अधिक तपास खालापूर पोलीस करीत आहेत.या मोहिमेत स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील,सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार शरद फरांदे,रणजीत सिंह खराडे,पोलीस शिपाई प्रदीप खरात या पथकाने सक्रिय सहभाग घेतला.

संबंधित आरोपींविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या रॅकेटमागील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे.खालापूर तालुक्यात अवैध दारू विरोधात पोलिसांनी दिलेला हा मोठा दणका असून बेकायदेशीर धंदेवाल्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.कायद्याच्या चौकटीबाहेर जाणाऱ्यांना माफी नाही,हा ठाम संदेश या कारवाईतून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.अशा कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलीस सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

# लाखनी नगरपंचायत विषय समितीच्या सभापती पदी राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपा युतीचा विजय

**दैनिक युवक आधार**

**लाखनी तालुका प्रतिनिधी :** लाखनी नगरपंचायत विषय समितीच्या सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया दिनांक 24/ 2 / 26 रोजी नगरपंचायत कार्यालय लाखनी येथे पार पडली. या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपा युतीचां विजय झाला.लाखनी नगरपंचायत विषय समितीच्या सभापती पदाची निवडणूक झाली असता स्वच्छता व वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापती पदी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित गटाचे श्री राजेश उद्धवराव निंबेकर व सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती म्हणून संदीप दिगंबर भांडारकर, महिला बालकल्याण



समितीच्या सभापती पदी सौ निशा संदीप मोहन कर, उपसभापतीपदी श्रीमती कांता रवींद्र निर्वाण तसेच पाणीपुरवठा व जलसंधारण समितीचे पदसिद्ध सभापती उपाध्यक्ष सौ लता रमेश रोडे यांचे नाव घोषित करण्यात आले आहे.

सभापती पदाच्या निवडणुकी सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून आशिष घोडे मुख्याधिकारी नगरपंचायत लाखनी, कार्यालयीन अधीक्षक कु. अंजली बारसागडे, प्रशासकीय अधिकारी लोकेश कटरे व इतर कर्मचारी यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यास सहकार्य केले.

# मंगनाळीचे सुपुत्र डॉ. श्रीनिवास कोलोड यांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न' पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/ गिरमाजी सुर्यकार :** तालुक्यातील मौजे मंगनाळी येथील रहिवासी तथा प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले डॉ. श्रीनिवास रामचंद्र कोलोड यांना आरोग्य विभागातील उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याबद्दल 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न' पुरस्कार तसेच 'महाआरोग्य सन्मान 2026' प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. कोलोड यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाल्याबाबतचे पत्र आरोग्य सेवा आयुक्तालय यांच्या वतीने देण्यात आले होते. त्यानुसार रविवार, दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजित राज्यस्तरीय समारंभात महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा पुरस्कार राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास सचिव इ. रविंद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, डॉ. नितीन आंबाडेकर, अतिरिक्त संचालक डॉ. सुनीता गोल्हाईत आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. कोलोड यांनी आंतररुग्ण व बाह्यरुग्ण सेवा सक्षमपणे पार पाडत मनोरुग्णांच्या उपचार व पुनर्वसनासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अंतर्गत अनेक गरजू रुग्णांना दिलेल्या उपचारांची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.डॉ. कोलोड यांच्या या यशाबद्दल आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी, सहकारी मित्रमंडळी तसेच मंगनाळी येथील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# घामाचा मका; कवडीचा भाव! सिल्लोडच्या पूर्व पट्ट्यात व्यापाऱ्यांची 'चांदी', बळीराजाची 'कोंडी'

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /सिल्लोड :** निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करून पिकवलेला मका आता बाजारपेठेतील दर घसरणीच्या कचाट्यात सापडला आहे. सिल्लोड तालुक्यातील अजिंठा डोंगररांगांलगतचा पूर्व पट्टा असलेल्या डोंगरगाव, अन्वी, रहिमाबाद, आसडी, पालोद या परिसरात सध्या मका काढणीचा हंगाम शिगेला पोहोचला असतानाच बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेला २४०० रुपयांचा हमीभाव केवळ कागदावरच उरला असून, प्रत्यक्षात व्यापाऱ्यांकडून १३०० ते १४०० रुपयांनी खरेदी केली जात असल्याने 'बळीराजा'च्या डोळ्यात पाणी आले आहे.




यावर्षी अतिवृष्टीमुळे पिकाचे मोठे नुकसान झाले. एकरी केवळ १२ ते १३ क्विंटल उत्पादन हाती लागत असताना, उत्पादन खर्च मात्र गगनाला भिडला आहे. बियाणे, खते, महागडी फवारणी आणि मळणी यंत्रांचे वाढलेले भाडे यामुळे एकरी खर्च २० ते २५ हजार रुपयांच्या पार गेला आहे. अशा परिस्थितीत १८०० रुपयांवरून मक्याचे दर थेट १३०० रुपयांवर येऊन ठेपल्याने, शेतकऱ्याचा लागवड खर्च निघणेही दुरापास्त झाले आहे. हमीभाव आणि बाजारभाव यातील ११०० रुपयांची ही तफावत शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारी ठरत आहे.

॥ दराचे वास्तव ॥

शासकीय हमीभाव: २४०० रु. (प्रति क्विंटल)

बाजारातील सध्याचा भाव: १६०० ते १७०० रु.

व्यापाऱ्यांची खाजगी खरेदी: १३०० ते १४०० रु.

शेतकऱ्यांचे थेट नुकसान: १००० ते ११०० रु.

शेतकऱ्यांची मागणी: २५०० रु. (किमान दर मिळावा)

डोंगरगाव-पालोद परिसरात मळणी यंत्रांचा आवाज घुमत असतानाच, बाजारपेठेत 'मालाला उठाव नाही' किंवा 'ओलावा आहे' अशी तांत्रिक कारणे सांगून व्यापारी शेतकऱ्यांच्या हतबलतेचा गैरफायदा घेत आहेत. आर्थिक निकड असल्याने नाईलाजापोटी मिळेल त्या भावात मका विकून शेतकरी मोकळा होत आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

**शासकीय हस्तक्षेपाची प्रतीक्षा**

"शासनाने केवळ हमीभावाच्या घोषणा न करता, प्रत्यक्षात हमीभाव केंद्र कार्यान्वित करून किमान २५०० रुपये दर मिळवून द्यावा," अशी आर्त हाक डोंगरगाव-अन्वी परिसरातील शेतकरी देत आहेत. प्रशासनाने तातडीने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन दर स्थिर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# बौद्ध समाजातील संस्थांना शासनामार्फत 10 लाख रुपयांपर्यंत मिळणार अनुदान ; इच्छुक संस्थांनी अर्ज सादर करण्याचे जिल्हा नियोजन अधिकारी श्री. उमेश सूर्यवंशी यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे :** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण अनुदान योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना त्यांच्या इमारतीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी 10 लाख रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार असून इच्छूक पात्र संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी व सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती रायगड-अलिबाग उमेश सुर्यवंशी यांनी केले आहे.योजनेसाठी पात्रतेचे निकषः संस्था राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त किंवा सदस्यांमध्ये 51 टक्क्यांपेक्षा जास्त सदस्य हे बौद्ध समाजातील असणे अनिवार्य आहे. संबंधित संस्था सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा सामाजिक क्षेत्रात कार्यरत असावी. एका संस्थेला या योजनेंतर्गत जास्तीत जास्त 5 वेळा अनुदान घेता येईल.अनुदान कोणत्या कामांसाठी मिळेल?-या योजनेतून शासन निर्णयानुसार इमारतीचे किरकोळ नूतनीकरण व डागडुजी, शुद्ध पेयजल व्यवस्था, ग्रंथालय/अभ्यासिका अद्ययावत करणे, विपश्यना केंद्राची दुरुस्ती, संगणक कक्ष उभारणे, प्रसाधनगृह बांधणे, फर्निचर खरेदी, सौर ऊर्जा उपकरणे, जनरेटर/इन्व्हर्टर आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे यांसारख्या 13 प्रकारच्या पायाभूत सुविधांसाठी निधी दिला जाईल.अर्ज करण्याची पद्धत व मुदतः इच्छुक पात्र संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-1) आणि आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती कार्यालय, नियोजन भवन येथे सादर करावेत, अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र, सदस्यांची यादी (प्रपत्र-3), मालमत्ता पत्रक/7/12 उतारा, ऑडिट रिपोर्ट आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप-अभियंत्यांनी साक्षांकित केलेले अंदाजपत्रक जोडणे आवश्यक आहे. इच्छूक पात्र संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## १० हजार रुपये ऐवजी संगणक परिचालकांना १७ हजार रुपये मासिक मानधन द्या

# आमदार बबनराव लोणीकर यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना मागणी

**वेळेवर व वाढीव मानधन, कर्मचारी दर्जा, प्रसूती रजा, नवीन संगणक व प्रिंटर यासह ५० लाख रुपयांचा अपघात विमा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार - आमदार बबनराव लोणीकर यांची संगणक परिचालकांना ग्वाही**



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - नामदेव मंडपे/मंठा जालना** : राज्यातील सुमारे २८५०० ग्रामपंचायतीमध्ये २० हजार संगणक परिचालक मागील १४ वर्षापासून प्रामाणिकपणे काम करून राज्याध्या ग्रामीण भागातील सुमारे ७ कोटी जनतेला विविध प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देणाऱ्या संगणक परिचालकांना महागाईच्या काळात अतिशय तुटपुंजे मानधन असून तेही ६-६ महिने मिळत नाही, ही परिस्थिती लक्षात घेता आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी प्रत्यक्ष भेटून संगणक परिचालकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

यावलकर समितीने ग्रामविकास विभागास दिनांक ३० मे २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार व ग्रामविकास विभागाचे तत्कालीन ग्रामविकासमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांच्या अध्यक्षतेखाली ११ जानेवारी २०२३ रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार व राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या कामाची गरज लक्षात घेता संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे अत्यंत गरजेचे आहे. अशी मागणी संगणक परिचालक संघटनेने केली असता आमदार बबनराव लोणीकर यांनी तुमचा आवाज निश्चितपणे मुख्यमंत्री महोदयापर्यंत पोहोचवतो असा शब्द उपस्थित त्यांना दिला.

महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने ग्रामविकास विभागाकडे अनेक वेळा मागणी करून सुद्धा ग्रामविकास विभागाने अद्याप पर्यंत यावलकर समितीच्या शिफारशीनुसार कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्या संदर्भात कार्यवाही केलेली नाही, त्याच बरोबर ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगातून निधी मिळत नसल्याने संगणक परिचालकांना ६-६ महीने मानधन मिळत नसल्याने २०२४ व्या विधानसभा निवडणूकी अगोदर आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी राज्याच्या निधीतून ३३६ कोटी रुपये वार्षिक निधीची तरतूद केली असल्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री मा. एकनाथरावजी शिंदे साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्यासह अर्थमंत्री मा. अजितदादा पवार साहेब यांनी केली होती व १० ऑक्टोबर २०२४ च्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्याचे सोशल मिडीयात प्रसारित केले होते या बाबीची आठवण देखील आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना करून देऊ असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

ग्रामविकास विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे किंवा आपले सरकार सेवा केंद्रासाठी राज्याच्या निधीतून वार्षिक ३३६ कोटी रुपयेची तरतुद केल्याचा कोणताही उल्लेख केला नाही, त्याचवेळी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य संघटनेच्या वतीने निवेदन देऊन शुद्धीपत्रक निर्गमित करण्याची विनंती केली होती, परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही ग्रामविकास विभागाने केली नाही उलट ११ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय कुणालाही विचारात न घेता ०५ ऑगस्ट २०२५ रोजी रद करून राज्यातील ग्रामपंचायत संगणकपरिचालकांवर अन्याय केला आहे. तसेच सध्या मागील १.५ वर्षापासून संगणकपरिचालकाची नियुक्ती कोणत्याही कंपनीकडून नाही, त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देणे आवश्यक आहे अशी मागणी देखील संगणक परिचालक आंदोलन आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे केली.

संगणकपरिचालक हे ग्रामीण भागातील सुमारे ७ कोटी नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देण्याचे काम करत असताना आजच्या महागाईच्या काळात तुटपुंजे असलेले १०,००० रुपये मानधन तरी प्रत्येक महिन्याच्या एका निश्चित तारखेला संगणक परिचालकांना मिळाले पाहिजे यासाठी ग्रामविकास विभागाने नियोजन करणे आवश्यक असताना संगणक परिचालकांना केलेल्या कामाचा मोबदला ६-६ महिने मिळत नाही. प्रत्येक वेळी मानधनासाठी शासन स्तरावर निवेदन द्यावे लागते, आंदोलन करावे लागते हि बाब दुर्दैवी असून संगणक परिचालकांची ही मागणी रास्त आहे यासाठी आपण निश्चितपणे ग्रामविकास मंत्र्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करू असे हे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

शासना समोर संगणक परिचालकांचा मुद्दा मांडला असता दिनांक १६ मार्च २०२४ रोजी च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामपंचायतीनी पैसे नाही दिले तर सदरील मानधनाची रक्कम शासनाकडून देण्यात येईल अशी हमीच शासनाने घेतलेली आहे. तसे ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ जुन २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. त्यामुळे महिन्याच्या एका निश्चित तारखेला संगणक परिचालकाचे मानधन करण्यची जबाबदारी शासनाची आहे, तरीही या महत्वाच्या मुद्द्याकडे ग्रामविकास विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून संगणक परिचालकांना वेळेवर मानधन देत नाही, हा संगणक परिचालकांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः पुढाकार घेईल असे हे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावलकर समितीच्या शिफारशीनुसार सुधारित आकृतीबंधात ग्रामपंचायत संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळणे, कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळण्यास वेळ लागत असेल तर सध्या असलेल्या १०००० रूपये मानधनात शासनाच्या निधीतून ७००० रु. वाढ करून संगणक परिचालकांचे मासिक मानधन १७००० रुपये करणे, ग्रामपंचायत संगणकपरिचालकांना कायमस्वरूपी जॉब सेक्युरिटी, कंत्राटी कामगारा प्रमाणे सर्व लाभ व सुविधा देणे, मागील १४ वर्षापूर्वी दिलेले संगणक व इत्तर साहित्य खराब झाल्याने संगणकपरिचालकांना ऑनलाईन कामकाज करण्यास अडथळा होत असल्याने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला शासनाने नवीन संगणक, प्रिंटर व इत्तर आवश्यक साहित्य पुरवणे, महिलां संगणकपरिचालकांना मानधनासहित प्रसूती रजा देणे, सर्व संगणक परिचालकांना किमान ५० लक्ष रुपयांचा अपघाती व आरोग्य विषयक विमा लागू करणे अशा मागण्यांची निवेदन संगणक परिचालकांनी आमदार बबनराव लोणीकर यांना दिले. यावेळी राज्याध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे राज्यसचिव मयूर कांबळे जालना जिल्हाध्यक्ष विजयानंद येडेकर अशोक चव्हाण, विष्णू ढोबळे. नारायण सोळंके, विजय प्रधान, केशव लहाने, हनुमान वाघ, जनार्धन इंगळे, भरत कव्हले, गणपत घारे रामेश्वर मुरकुटे, राम सुपेकर. ज्ञानेश्वर सूर्यवंशी. विजय वाघ. भरत कवळे. गणेश अहिरे. संग्राम ढिकले. विवेक देवरे. सुरेश मगर. शैलेश संत. सचिन माळी. सागर पवार. सचिन गरड. स्वप्निल अंभोरे. अविनाश आढे. दिलीप गाढवे. प्रल्हाद राऊत. ओम प्रकाश प्रधान. ज्ञानेश्वर साळवे नारायण चव्हाण. कृष्णा मोगल. अरुण उबाळे.यांच्यासह हजारोच्या संख्येने संगणक परिचालक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ब्रम्हाकुमारीजच्या राज्यव्यापी मोहिमेचा आज शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव/ वाडी नागपूर** : समाजात एकमेकांप्रती विश्वास – सौहार्दता - एकता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक अधिक वृध्दींगत व्हावी यासाठी ब्रम्हाकुमारीजच्या राज्यव्यापी अभियानाचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिनांक 25 फेब्रुवारी रोजी सायंकाळी भव्य शुभारंभ होत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माऊंटआबू येथील ब्रह्माकुमारीजचे अतिरिक्त महासचिव बी. के. मृत्युंजय भाई, राजयोगिनी बी. के. चंद्रिका दीदी, नागपूर प्रमुख



राजयोगिनी बी. के. रजनी दीदी व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होईल.

जामठा येथील ब्रम्हाकुमारीज विश्वशांती सरोवर येथे या समारंभासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपती यांच्या दौऱ्यासंदर्भात संपूर्ण आढावा घेतला असून शासकीय यंत्रणांना योग्यती दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेसाठी ब्रम्हाकुमारीज मार्फत आठ सिध्दांत निश्चित करण्यात आले आहेत. यात व्यसनमुक्त समाजाची निर्मिती, शाश्वत जीवन पध्दती, स्वच्छता व नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तीत कर्तव्याचे भान, मानवतेसाठी कर्तव्यतत्परता, मूल्याधारीत शिक्षण, निर्मळ व संयमी जीवन- योगा, हरीत व शाश्वत महाराष्ट्र, सुसंवादातून आनंदी जीवन यावर भर दिला आहे. या सिध्दांतातूनच महाराष्ट्रात स्वर्णिम युगाचा प्रत्यय अधिक बळकट होईल, असे ब्रम्हाकुमारीज यांनी नमूद केले आहे. राज्यातील प्रत्येक तालुका पातळीवरील ब्रम्हाकुमारीजच्या केंद्रामार्फत ही मोहीम प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचविण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात अध्यात्मिक चेतना, सामाजिक समरसता आणि सकारात्मक विचार याला अनन्य साधारण महत्व आहे. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी पुर्व नोंदणी अनिवार्य असून नोंदणी झालेल्या व्यक्तींनाच प्रवेश राहील. ज्याची नोंदणी झाली आहे त्यांनी आपले मुळ अधारकार्ड, ओळखपत्र सोबत ठेवून सुरक्षा नियमांचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## विचारांची शिवजयंती डीजेच्या गजरात नव्हे, तर शिवचरित्राच्या प्रकाशात आमणी बु. येथे प्रेरणादायी शिवव्याख्यान

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : महाराष्ट्राच्या मातीत आजही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाचे प्रतिध्वनी दुमदुमत आहेत. शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या संकल्पनेचा अभंग स्वर जपणारी नवी पिढी घडावी, या उदात्त ध्येयाने आमणी बु. येथील शिवजन्मोत्सव समितीने यंदा शिवजयंती निमित्त एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम हाती घेतला आहे.

डीजेच्या कर्णकर्कश गजरात नव्हे, तर शिवचरित्राच्या तेजस्वी विचारांत शिवजयंती साजरी व्हावी, या भूमिकेतून सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ अंतर्गत विशेष शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ७.०० वा. प्रख्यात व्याख्यात्या भाग्यश्रीताई मोहीते पाटील यांचे प्रेरणादायी शिवव्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानातून शिवरायांचे



जीवनचरित्र, त्यांचा दूरदर्शी आणि लोकाभिमुख राज्यकारभार, स्वराज्याची भव्य संकल्पना, स्त्रीसन्मानाची भूमिका तसेच समाजप्रबोधनाचा व्यापक संदेश उलगडला जाणार आहे. विशेष म्हणजे जिजाबाई यांच्या संस्कारांची शिकवण आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.

“नाचून नव्हे, वाचून साजरी व्हावी शिवजयंती” हा संदेश देत हा कार्यक्रम विचारांचा दीपोत्सव ठरणार आहे. लहान मुलांच्या मनात शिवरायांचा आदर्श दृढ व्हावा, युवकांनी शौर्यासोबत संयम, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा आत्मसात करावी, तसेच समाजात सकारात्मक प्रबोधन व्हावे, या हेतूने समितीने पुढाकार घेतला आहे.

या कार्यक्रमास महागाव तहसीलचे तहसीलदार अभय मस्के, महागाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार धनराज निळे, महागाव तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष अमोल चिकने, जगदीश नरवाडे जन आंदोलन संघर्ष समिती पंकज इंगळे यांची प्रमुख उपस्थिती समस्त गावकरी, नवतरुण युवक आणि महिलांची लक्षणीय उपस्थिती माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.


शिवजन्मोत्सव समिती, आमणी बु. (ता. महागाव) यांच्या वतीने सर्व शिवप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून विचारांची शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिवरायांच्या विचारांचा दीप अखंड प्रज्वलित ठेवत स्वराज्याच्या संस्कारांची मशाल पुढील पिढीकडे सुपूर्द करण्याचा निर्धार यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

## भुकेचा केंद्रबिंदू” ग़ज़ल संग्रहावर आणखी एका पुरस्काराची मोहर

**सलग सहाव्या पुरस्काराने होणार सन्मान**

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ)** : महागाव येथील पत्रकार तथा मराठी ग़ज़लकार गजानन वाघमारे यांच्या “भुकेचा केंद्रबिंदू” या ग़ज़ल संग्रहास

काव्यरसिक मंडळ, डोंबिवली यांच्या तर्फे दिला जाणारा “राज्यस्तरीय कै.अनिल साठे स्मृती सर्वोत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्कार २०२६” जाहीर झाला आहे. १ मार्च रोजी डोंबिवली येथे आयोजित राज्यस्तरीय हीरक महोत्सवात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. गेल्या दहा महिन्यांत “भुकेचा केंद्रबिंदू” या संग्रहाला मिळणारा हा सहावा राज्यस्तरीय पुरस्कार आहे. यापूर्वी या ग़ज़ल संग्रहास




स्व. व्यंकटराव देशमुख स्मृती ग़ज़ल गुंफन पुरस्कार, शेगाव बुद्रुक येथील कवितेच्या घराचा बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय ग़ज़ल पुरस्कार, हिमायतनगर येथील राज्यस्तरीय संवेदना सर्वोत्कृष्ट ग़ज़ल संग्रह पुरस्कार,नागपूर येथील साहित्य विहार संस्थेचा सर्वोत्कृष्ट ग़ज़ल संग्रह पुरस्कार आणि आशादीप राज्यस्तरीय नामदेव ढसाळ उत्तेजनार्थ पुरस्कार २०२६ असे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता काव्यरसिक मंडळ, डोंबिवली यांच्या तर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय कै.अनिल साठे स्मृती सर्वोत्कृष्ट गझलसंग्रह पुरस्काराची मोहोर "भुकेचा केंद्रबिंदू" वर उमटली आहे. या संग्रहात शंभर ग़ज़लांचा समावेश असून भूक, बेरोजगारी, गरीबी, जातीय विद्वेष, धार्मिक कट्टरता, अंधश्रद्धा, शेतकरी आत्महत्या अशा ज्वलंत सामाजिक प्रश्नांची सखोल व संवेदनशील मांडणी गजानन वाघमारे यांच्या ग़ज़लेतून प्रत्ययास येते. अल्पावधीतच 'भुकेचा केंद्रबिंदू' या ग़ज़ल संग्रहास तब्बल सहा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्यामुळे ग़ज़लकार गजानन वाघमारे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## आष्टी तालुक्याची कामधेनू महेश सहकारी साखर कारखाना येणाऱ्या गळीत हंगामात सुरु होणार, शेतकरी बांधवांनी ऊसाचे उत्पन्न वाढवावे – मा.आ.भिमरावजी धोंडे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी /मारुती सत्रे** : आष्टी तालुक्याची कामधेनू असलेल्या महेश सहकारी साखर कारखाना मागिल १२ वर्षापासून बंद अवस्थेत होता.साखर कारखाना नवीन संचालक मंडळाच्या ताब्यात गेला आहे.शेतक-यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने कर्ज भरून कारखाना ताब्यात घेतल्याने शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण निर्माण केला आहे.अनेक वर्षांपासून बंद असलेल्या साखर कारखान्याचे रविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी श्रीफळ वाढवून पूजन करून प्रत्यक्ष मशनरी दुरुस्ती व ओव्हर ऑइलिंग कामाचा शुभारंभ मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिल व बायलर डिजी सेट चे विधीवत पुजन करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली पुढील गळीत हंगामात कारखाना सुरू होणारच असल्याचा विश्वास व्यक्त करत शेतकरी बांधवांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऊसाचे उत्पन्न वाढवण्याचे आवाहन मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी केले ते कडा महेश सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष कामकाज पुजन प्रसंगी बोलत होते.यावेळी अजय दादा धोंडे,अभयराजे धोंडे,राजु काका धोंडे,नियामत बेग साहेब, अ‍ॅड. हनुमंत थोरवे,आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे, राजाराम ननवरे,स्विकृत सदस्य बबनराव औटे, हरिभाऊ जंजिरे,सोनाजी गांजुरे,लांडगे मामा, पांडुरंग गावडे,शहादेव गर्जे,नानाभाऊ वाडेकर, अंकुश मुंडे, बजरंग कर्डिले, सरपंच दादा जगताप, सुनिल शिंदे,कुंडलिक आस्वर, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार संजय खंडागळे,पत्रकार संतोष नागरगोजे,पत्रकार अक्षय विधाते, छायाचित्रकार शरद गर्जे, संचालक बाबासाहेब आंधळे,आदी उपस्थित होते.पुढे बोलताना मा.आ.भिमरावजी धोंडे म्हणाले की कारखाना अनेक वर्षापासून बंद असल्याने बरेच काम करणे आहे.सहा सात महिन्यांचा कालावधी आहे. या कालावधीमध्ये काम पूर्ण करून पुढील गळीत हंगामामध्ये कारखाना सुरू करणार आहोत. आपल्याला जर लायसन नसतं मिळालं तर हा कारखाना भंगारात विकावा लागला असता काही लोकांचा तसा डाव होता.आपण सर्व जण मिळुन कारखाना सुरू करणार आहोत.हि वास्तु आपल्याला टिकवून ठेवायची आहे. आपण कारखान्यासाठी मोर्चा काढला यासाठी शेतकरी बांधवांनी उसाच्या आता नवीन २५ जातीचे नवीण वाण आले असून आम्ही लखनऊ वरून ७३१८१ जातीचा नमुना त्या ऊसाची ऍव्हरेज १०० टन प्रती एकर आहे.लखनऊ चे क्लीन कमिशनर यांना विनंती केली आहे. प्रायोगिक तत्त्वावरती रोपे किंवा बेणे देण्याची मागणी केली आहे.मिळून जातील ऊसाची लागवड शेतकरी बांधवांनी करून जास्तीत जास्त उत्पन्न घ्यावे असे आवाहन केले तालुक्यातील अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. कारखाना परिसरात श्रीफळ वाढवून विधिवत पूजन करून नव्या सुरुवातीची घोषणा करण्यात आली. वेदमंत्रांच्या उच्चारात पूजा करण्यात आली आणि कारखाना लवकरच सुरू होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, कारखाना सुरू झाल्यास परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल तसेच स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. अनेक वर्षांपासून बंद असल्याने परिसराच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला होता. आता नव्या व्यवस्थापनाच्या माध्यमातून कारखाना पुन्हा कार्यरत करण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया सुरू करण्यात आल्या आहेत.शेतकरी व नागरिकांनीही कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असून या पूजन सोहळ्यामुळे परिसरात आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमास कार्यकारी संचालक व कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार बांधव मोठ्या उपस्थित होते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, खोपोली शाखेतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'दिल, दोस्ती, दुनियादारी' संवाद

**दैनिक युवक आधार**
**खालापूर/संतोष शेवाळे** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, खोपोली शाखेतर्फे दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०८:०० ते ०९:३० या वेळेत "दिल, दोस्ती, दुनियादारी" हा उपक्रम खोपोली येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या आनंद शाळा व जूनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स येथे इयत्ता ११ वी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संवादक म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सरचिटणीस आरती नाईक या उपस्थित होत्या.




या कार्यक्रमात रिलेशनशिप, ब्रेकअप, लव्ह ॲट फर्स्ट साइट अशा विषयांना स्पर्श करून प्रेम व आकर्षण यांतील फरक स्पष्ट करण्यात आला. तसेच प्रपोजल कसे हाताळावे, प्रेमात असताना कोणत्या बाबींबाबत सतर्क राहावे, नकार देताना व तो स्वीकारताना कोणती काळजी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला, तसेच प्रेम आणि हिंसा यांवरही भाष्य करण्यात आले. या कार्यक्रमात इयत्ता ११ वी कॉमर्सचे एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या आनंद शाळेच्या चेअरपर्सन आसावरी दंडवते व मुख्याध्यापिका सीमा त्रिपाठी यांनी विशेष सहकार्य केले. तसेच या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड, खोपोली शाखा कार्याध्यक्ष राकेश गायकवाड, खोपोली शाखा प्रधानसचिव महेंद्र ओव्हाळ हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी संयोजनासाठी विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह दयानंद पोळ, महिला सहभाग विभागाच्या कार्यवाह प्रतिभा मंडावळे, तसेच सांस्कृतिक विभागाच्या कार्यवाह ज्योती भुजबळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

## देवगाव फाटा हादरला! शेतात आढळला 5–6 वर्षांचा नर बिबट्या मृतावस्थेत; वनविभागाचा तपास सुरु

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : देवगाव येथील देवगाव फाटा रस्त्यालगत दत्तू कोंडाजी बोचरे यांच्या मालकीच्या गट क्रमांक ९६/२ मधील शेतात आज (दि.२४) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास अंदाजे ५ ते ६ वर्षांचा नर जातीचा बिबट्या मृत अवस्थेत आढळून आला. या घटनेमुळे देवगावसह परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चिकू फळबागेत काम करणाऱ्या कामगारांना बिबट्या पडलेल्या अवस्थेत दिसून आला. सुरुवातीला तो जिवंत असल्याची शंका व्यक्त करण्यात येत होती; मात्र जवळ जाऊन पाहणी केली असता तो मृत असल्याचे स्पष्ट झाले. तत्काळ वनविभागाला याची माहिती देण्यात आली.




माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ, वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक बचाव पथक निफाडचे सदस्य ज्ञानेश्वर पवार, सादिक शेख, वैभव दौंड, विजय माळी, काशिनाथ माळी, शरद चांदोरे, सागर दुसिंग, भारत माळी तसेच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसर सील करून सखोल पाहणी केली व आवश्यक ती खबरदारी घेतली.

मृत बिबट्याचा पंचनामा करण्यात आला असून प्राथमिक अंदाजानुसार तो ५ ते ६ वर्षांचा नर असल्याचे सांगण्यात आले. मात्र मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पंचनामा पूर्ण झाल्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन शासकीय वाहनाद्वारे पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी–१ डॉ. अमोल दराडे यांच्याकडे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी वनविभागामार्फत पुढील तपास सुरू आहे.

घटनास्थळी उपसरपंच लहानु मेमाने, पोलीस पाटील सुनील बोचरे, ग्रामपंचायत सदस्य किशोर बोचरे, अण्णासाहेब बोचरे, चांगदेव बोचरे, रामु बोचरे आदी उपस्थित होते.

दरम्यान, अलीकडील काळात परिसरात बिबट्यांच्या हालचाली वाढल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी शेतात एकटे जाणे टाळावे व वन्यप्राण्यांची हालचाल आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सोशल मीडियाचा वाढता प्रभाव ; तरुणींना योग्य मार्गदर्शनाची गरज — रोशन खोब्रागडे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा** : अलीकडच्या काळात फेसबुक , इंस्टाग्राम आणि यूट्यूब यांसारख्या सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे तरुण पिढीच्या जीवनशैलीत मोठे बदल दिसून येत आहेत. विशेषतः काही मुली ऑनलाईन मैत्री, प्रेमप्रकरणे आणि आभासी आकर्षणाच्या जाळ्यात अडकून भावनिक तणावाला सामोऱ्या जात आहेत. या तणावामुळे शिक्षणात अडथळे, कुटुंबातील मतभेद आणि काही वेळा



टोकाचे निर्णय घेतले जात असल्याचे चित्र समाजासमोर येत आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ता रोशन खोब्रागडे यांनी चिंता व्यक्त करत म्हटले आहे की, "सोशल मीडिया हे साधन आहे; त्याचा योग्य वापर झाला तर तो प्रगतीसाठी उपयुक्त ठरतो, पण अतिरेक आणि चुकीचा वापर आयुष्य घडवण्याऐवजी बिघडवू शकतो."रोशन खोब्रागडे यांनी पालकांना आवाहन केले आहे की त्यांनी मुलींशी मोकळा संवाद साधावा, त्यांच्या भावना समजून घ्याव्यात आणि डिजिटल साक्षरतेबाबत योग्य मार्गदर्शन द्यावे. तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशन शिबिरे, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आणि नैतिक मूल्यांवर आधारित कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.समाजातील विविध संस्था, शिक्षक आणि पालक यांनी एकत्र येऊन सकारात्मक विचार, स्वसंरक्षण, करिअर नियोजन आणि मानसिक आरोग्य याबाबत जनजागृती केल्यास तरुणींना योग्य दिशा मिळू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे."तरुणींनी स्वतःच्या आयुष्याला प्राधान्य देत शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मविश्वास यावर लक्ष केंद्रित करावे; कारण सक्षम आणि जागरूक तरुणीच समाजाचा खरा पाया आहेत," असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दादा, तुमचा निर्णय चुकला... माघारी या'; सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भावूक"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी नासिकेत पानसरे/पनवेल** :' दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत भावनिक शब्दांत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. "गेली २२-२३ वर्षे आम्ही एकत्र काम केले. आज आपल्या सहकाऱ्याबद्दल शोकप्रस्तावावर बोलण्याची वेळ आली आहे, हे अत्यंत दुःखद आहे. अजित पवारांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही," असे शिंदे म्हणाले.

"देवेंद्रजी आणि मी मित्र गमावला"

शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, "ज्या दिवशी दादा गेले, त्या दिवशी प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. लाख गेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे. नियतीसमोर ते हरले. लाखो अनुयायांना ते पोरके करून गेले. पवार कुटुंबावर काळाने घाला घातला." स्वतःच्या वैयक्तिक दुःखाचा उल्लेख करत ते म्हणाले, "मीही अपघातात माझी दोन मुले गमावली आहेत. माझे गुरु आनंद दिघे यांनाही अपघातात गमावले. त्यामुळे हे दुःख काय असते, मला ठाऊक आहे. देवेंद्रजी आणि मी एक मित्र गमावला आहे."

अभ्यासू, शिस्तप्रिय आणि कठोर निर्णय घेणारा नेता

अजित पवारांच्या कार्यशैलीबद्दल बोलताना शिंदे म्हणाले, "प्रशासनावर मजबूत पकड असलेला नेता आपण गमावला आहे. त्यांच्या हातात फाईल गेली की काय कमी आहे, हे ते लगेच सांगायचे. बैठकीत साधा कागदाचा तुकडा पडला तरी चालत नसे. ते शब्द आणि वेळेला प्रचंड महत्त्व देणारे होते." कोरोना काळात मंत्रालयात जाऊन काम करणारे ते मोजके नेते होते, अशी आठवण त्यांनी सांगितली. सरकार स्थापनेच्या चर्चेदरम्यान घेतलेल्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी स्वतःहून उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचे जाहीर केले होते, ही आठवणही त्यांनी सांगितली.

"मुख्यमंत्री होण्याचे भाग्य नशिबाने हिरावले"

"दुर्दैवाने अजितदादांना मुख्यमंत्री होता आले नाही. नशिबाने साथ दिली असती तर ते नक्कीच मुख्यमंत्री झाले असते. राजकारणात मतभेद असतात, पण ते अजातशत्रू होते. त्यांनी खिलाडूपणा जपला," असे शिंदे म्हणाले. पहाटे पाच वाजता अधिकाऱ्यांना बोलावून कामे आटोपणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. "आमचे सरकार २४/७ काम करणारे होते. त्यांनी कधीच कामात तडजोड केली नाही," असेही त्यांनी नमूद केले.

"दादा, तुमचा निर्णय चुकला..."

भावनांनी दाटून आलेल्या स्वरात शिंदे म्हणाले, "दादा म्हणजे स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा पाळणारा नेता. आज सभागृहात पाहताना ते डोळ्यासमोर उभे राहतात आणि वाटते – दादा, तुमचा हा निर्णय चुकलेला आहे, माघारी या." सुनेत्रा पवार यांनी जबाबदारी स्वीकारली असून, "आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. विकास आता लांबणार नाही, थांबणार नाही," अशी ग्वाही देत शिंदे यांनी भाषणाचा समारोप केला.

## उभ्या ट्रकला दुचाकीची धडक; निल्लोडचे दोन तरुण जागीच ठार

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड:-** छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील चिंचखेडा (ता. सिल्लोड) येथे सोमवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात दोन तरुणांचा जागीच अंत झाला. उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून दुचाकीने जोराची धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. कैलास सखाराम मगर (वय ४५) व संजय बारीकराव खटाळ (वय ३५, दोन्ही रा. निल्लोड) अशी मृतांची नावे असून, दोघेही कुटुंबाचे एकमेव आधार होते.

मयत कैलास व संजय हे माणिकनगर येथील हॉटेल 'गुरु बिअर बार'मध्ये कामाला होते. सोमवारी रात्री काम संपवून ते दुचाकीने (MH 20 FH 1413) निल्लोडकडे निघाले होते. याच दरम्यान, चिंचखेडा येथील हॉटेल प्रीतीजवळ पाण्याचे PVC पाईप घेऊन जाणारा ट्रक (MH 16 CC 4945) उभा होता. चालक टायरची हवा तपासण्यासाठी थांबलेला असताना, पाठीमागून येणाऱ्या दुचाकीची ट्रकला भीषण धडक बसली. स्थानिकांनी जखमींना तातडीने सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित करण्यात आले.





निल्लोड गावातील हे दोन्ही तरुण अत्यंत गरीब कुटुंबातील होते. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच संपूर्ण गावावर दुःखाचे सावट पसरले. मंगळवारी गावात एकाही घरात चूल पेटली नाही. दुपारी अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वडोदबाजार पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

या अपघातामुळे महामार्गावरील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. सिमेंट रस्त्यावरील दुभाजकाची उंची अवघी ३ फूट असल्याने समोरून येणाऱ्या वाहनांचा प्रखर प्रकाश (High Beam) थेट चालकाच्या डोळ्यावर पडतो. त्यामुळे समोर उभी असलेली वाहने दिसत नाहीत . याच तांत्रिक त्रुटीमुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज नागरिक व्यक्त करत आहेत.

## सणसर भवानीनगर कडकडीत बंद ; भिगवण लव्ह जिहाद व अपहरण प्रकरणी निषेध

**दैनिक युवक आधार**
**सणसर / विकास क्षत्रिय** : भिगवण येथील मुलीच्या अपहरण आणि लव्ह जिहाद प्रकरण व बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे झालेल्या महिलांवर अत्याचार आणि हल्ला निषेधार्थ सणसर भवानीनगर येथे २४ फेब्रुवारी २०२६ रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. सकाळपासूनच गावातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला. गणपती चौकात सकल हिंदू समाज व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत घोषणाबाजी केली. इंदापूर तालुका विश्व हिंदू संघटनेच्या वतीने एक दिवस बंद चे निवेदन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांना देण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे तालुका अध्यक्ष बजरंग सर्जेराव रायते,आकाश पलंगे,सागर महाराज गुप्ते, किरण घोरपडे,प्रसाद जाधव,सोनू जाधव,अमोल धोत्रे, भूषण बोराटे,योगेश




सावंत, अनिल गुप्ते,अभिजीत निंबाळकर,दत्तात्रय शितोळे, अमोल कोयले,गांधी शेठ,कुलदीप शिंदे,अभिषेक जाधव,स्वप्निल जाधव,परशुराम घायाळ,हेमंत गोडबोले आदींसह विविध संघटनांचे कार्यकर्ते व व्यापारी उपस्थित होते. निवेदनात मुख्य आरोपी तसेच सूत्रधारांवर पोक्सो कायदा आणि मोक्का कायदा अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

## लाखनी बाजार समितीतील ६० मे .टन अवैध वाहन काटा दुसऱ्यांदा जप्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा** : लाखनी (दि. २१ फेब्रुवारी २०२६): कृषि उत्पन्न बाजार समिती, लाखनी येथील ६० मे.टन क्षमतेचा Fabricated (Non-Standard) वाहन काटा वैध मापन शास्त्र विभागाने दुसऱ्यांदा जप्त केला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. दिपराज पी. इलमकार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचे समोर आले आहे.

माहितीनुसार, तत्कालीन संचालक मंडळाने १४ जून २०२० रोजी सुमारे रु. ५,०८,५८०/- किमतीत वाहन काटा खरेदी केल्याचे दाखवले. हा काटा 'Sansui' कंपनीचा असल्याचे भासविण्यात आले. मात्र प्रत्यक्षात तो Fabricated (Non-Standard) असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. तसेच 'वेटोट्रानिक्स वेईंग सिस्टीम, रायपूर' या नावाने जीएसटी क्रमांक 22AABFW2985R1ZI नमूद करून बिल सादर करण्यात आले होते. परंतु संबंधित जीएसटी क्रमांक १ ऑक्टोबर २०१९ रोजीच रद्द झालेला असल्याची




माहिती राज्य कर विभाग, नवा रायपूर (छत्तीसगड) येथून १८ ऑगस्ट २०२५ रोजी देण्यात आली. शिवाय संबंधित फर्म अस्तित्वात नसल्याचेही स्पष्ट झाले.

लेखापरीक्षण अहवालात वाहन काटा चेतन वैरागडे यांच्याकडून रु. ७,४४,५८०/- ला घेतल्याचे दाखवण्यात आले असून, प्रत्यक्ष खरेदी किंमत व दाखवलेली किंमत यात तफावत असल्याने सुमारे रु. २,३६,०००/- ची अफरातफर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.या संदर्भात १० फेब्रुवारी २०२५ रोजी वैध मापन शास्त्र कार्यालय, भंडारा येथे तक्रार दाखल करण्यात आली होती. चौकशीत सदर काटा Fabricated असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. सुरुवातीला ९ सप्टेंबर २०२५ रोजी काटा जप्त करण्यात आला होता; मात्र दंड भरून तो पुन्हा सुरू करण्यात आल्याचा आरोप आहे.

यानंतर डॉ. इलमकार यांनी १२ जानेवारी २०२६ रोजी मंत्रालय स्तरावर तक्रार केल्यानंतर सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र, नागपूर विभाग यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी काटा जप्त करून शासन जमा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार १९ फेब्रुवारी २०२६ रोजी वाहन काटा बंद करून जप्त करण्यात आला.सन २०२० ते २०२५ दरम्यान अवैध व Non-Standard काट्याचे नूतनीकरण करून शेतकरी व व्यापाऱ्यांची दिशाभूल केल्याचा आरोप होत असून, संचालक मंडळावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. भंडारा जिल्ह्यात Fabricated (Non-Standard) वाहन काटा जप्त करण्याची ही पहिलीच कारवाई असल्याची चर्चा असून, लाखनी बाजार समितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणात जीएसटी संदर्भातही स्वतंत्र तक्रार करण्यात आली असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अपक्ष संचालक रजनीकांत बोरेले यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्त महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी** : पांढरकवडा येथील रजनीकांत डालूरामजी बोरेले व्हिसल ब्लोअर आणि अपक्ष संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या तर्फे कृषी उत्पन्न बाजार समिति येथे एकांतेश्वर शिवलिंग आणि हनुमानजी यांचा मंदिर आहे.या शिवाल्यात महा शिवरात्रीच्या दिवशी रजनीकांत बोरेले यांच्या कडून मोठ्या उत्साहने शिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला होता.मोठ्या उत्सावाने या ठिकाणी शिवरात्री साजरा करण्यात आला होता.दुसऱ्या दिवसी बोरेले कडून जेवनाचा प्रसाद दरवर्षी ठेवल्या जाते परंतु शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता झारखंड च्या रजरप्पा येथील आई छिंद मस्तिकचे दर्शन करीता गेले तेथून देवघर बैजनाथ धाम दर्शन घेवून पुढे बिहार राज्यातुन गयाजी ते उत्तर प्रदेशच्या काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग आणि गंगाजी दर्शन





घेवून मध्ये प्रदेश वरुण महाराष्ट्रतील पांढरकवडा येथे दि.२०/०२/२०२६ ला पहाटे आले त्यामुळे शिवरात्रीला महाप्रसाद दिनांक २१/०२/२६ रोजी ठेवण्यात आला तदपुर्वी शिवलिंग महादेव आणि हनुमानजी यांची पूजा अर्चना करुण नैवेद्य अर्पण करुण आरती करुण प्रसाद ला प्रारंभ करण्यात आले.

या वेळी अनेक शिव भक्त आणि महिला भगतांनी जेवन प्रसादचा आस्वाद घेतला आहे.यावेळी रजनीकांत बोरेले बंधु लक्ष्मीकांत बोरेले,(बोरेले), सुपुत्र सर्वम रजनीकांत बोरेले,,काका राजू बोरेले, विशाल बोरेले, पुतने बंटी बोरेले यांच्या सह बोरेले परिवार उपस्थित होता यावेळी ब्राह्मण भोजन नंतर पवन महाराज शर्मा,जय पंचोली, शुभम केलापुरे,कुणाल बड्सर, दर्शन माटोलिया यांना रजनीकांत बोरेले यांचे हस्ते वस्त्र, दक्षिणा देवून त्यांचे सन्मान करण्यात आले,या वेळी प्रतिष्ठित व्यापारी प्रमोद भूत,आनंद चोपड़ा, गणेश सिंघानिया,अर्जुन पाटिल, गुंटु धादौड,गणेश हटकर, राजू कैटिकवार,महेश आदेवर,पवन शंकर अक्केवार, मोरेश्वर डेहनकर,ललित सिंघानिया,स्मित झाजरीया,अक्षय पीपलवा,भालचन्द्र मडावी,गणेश कस्तूरवार,राजू भंडारवार,दिनेश कस्तूरवार,आतीष गेडाम, पार्बता मुळे,दत्ताढाले,गजु रुखमावार आणि शेतकरी वर्ग यांच्या सह अनेक मान्यवरांची उपस्थिति लाभली होती.

# बामणी फाटा–पुसद राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले

**दैनिक युवक आधार**

**हदगाव प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे :** हदगाव तालुक्यातील दळणवळणासाठी महत्त्वाचा मानला जाणारा बामणी फाटा-कोळी-तळणी-पुसद या रखडलेल्या महामार्गाचे काम गेल्या चार वर्षापासून संत गतीने असल्याने परिणामी इथल्या शेतकऱ्यांच्या पिके माखली गेली असल्याने त्याचा थेट परिणाम शेत शिवारांवर होऊ लागला आहे.

रस्त्याला लागून असलेल्या शेतात पीक घेणे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे बनत आहे. आशा भागात काम करायला मजुरही टाळाटाळ करीत आहेत हदगाव तालुक्यातील बामणी फाटा तळणी- पुसद या रस्त्याचे काम गेल्या चार वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले होते. हे काम अद्याप ही पूर्णत्वास गेले नाही. बामणी फाटा कोळी तळणी पुसद चालू असलेल्या राष्ट्रीयमहामार्गावर जागोजागी गिट्टी दगडांचे खच टाकण्यात आले तर काही ठिकाणी मातीचे काम केल्या गेले. सदरील या रस्त्यावरूनच सध्या वाहतूक होत असते. रस्त्यावरून धावणाऱ्या वाहनामुळे सर्वत्र धूळ पसरत आहे प्रामुख्याने रस्त्यांचा शेजारील शेतात असणारी उभी पिके धुळीने माखलेली बघायला मिळतात दिसून येत आहे. हदगाव तालुक्यातील सिंचनाच्या सोयी असल्याने येथे बारमाही शेती



अधिक प्रमाणात आहे प्रामुख्याने केळी, हळद, भाजीपालाव गींय पिकांचे उत्पादन अधिक घेतले जाते, याच तालुक्यात रस्त्यांचे जाळे सध्या खीळखिळे बनलेली आहे. वर्षानुवर्षे रस्त्यांची कामे थंड बस्त्यात बंद पडलेली आहेत, अर्धवट रस्त्यांमुळे अपघात वाढलेले असून अनेकांना जीवसुद्धा गमवावा लागला आहे. परंतु संबंधित या रस्त्यांची कामे करणारी सूर्या शिता ही एजन्सी सद्या काम करणारी यंत्रणा काम करायला तयार नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. रस्त्यांचा विषय सुटत नसल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. धुळीमुळे झाडांची वाढ फळधारणेवरी परिणाम होत असल्याने नुकसान देखिल होत असल्याचे इथल्या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सदरील काम लवकरात लवकर होउन अधिक प्राधान्य देऊन शेतकऱ्याना योग्य न्याय देण्याची मागणी सातत्याने केली जात आहे.

# संत निरंकारी मंडळातर्फे श्रीवर्धन येथे स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** संत निरंकारी मिशनच्या सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या पुढाकाराने, बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या शिकवणुकीतून प्रेरणा घेत ‘प्रोजेक्ट अमृत’ हा उपक्रम राबविण्यात आला. मानवाला निसर्गाबद्दल अधिक संवेदनशील बनवत जलसंरक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संतुलनाचा सामूहिक संकल्प दृढ करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश असून त्या अनुषंगाने श्रीवर्धन समुद्र किनारपट्टीचा सुमारे ३ किमी. परिसराचा भाग १२५ पेक्षा जास्त निरंकारी सेवादार भाविक भक्तगणानं मार्फत स्वच्छ करण्यात आला. या विशेष कार्यक्रमासाठी श्रीवर्धन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अतुल चौगुले, उनगराध्यक्ष अनंत गुरव, प्रशासकीय अधिकारी राहुल भुगे, कक्ष अधिकारी निवास गुरव, वित्त अधिकारी वैभव अडसूळ,



स्वच्छता पाणीपुरवठा निरीक्षक पांडुरंग इंगळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

पाणी हे निसर्गाचे अमूल्य वरदान आहे. जीवनाचा मूलाधार आणि मानवसभ्यतेची जीवनरेखा असलेले हे जल स्वच्छ व संरक्षित राहिले, तर केवळ पर्यावरणच नव्हे, तर मानवसमाजाचे एकूण आरोग्य आणि संतुलन अधिक सक्षम होते. याच विचाराला कृतीरूप देत नैसर्गिक जलस्रोत, नद्या, तलाव, सरोवरे आणि समुद्रकिनाऱ्यांच्या स्वच्छता व संवर्धनासाठी उभारलेला व्यापक उपक्रम आज जन-माणसासाठी प्रेरणेचा स्रोत ठरत आहे. ही चळवळ केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून जागरूकता, जबाबदारी आणि सामूहिक सहभागाचा ठोस संदेश देणारी ठरली आहे.

स्वच्छ जल, स्वच्छ मन’ या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य आयोजन सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीरीत्या पार पडले. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदविला. हा उपक्रम केवळ पर्यावरणीय प्रयत्न नव्हता; तर अध्यात्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम होता. या माध्यमातून जनमानसात कर्तव्यभाव आणि जागरूकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

निःसंशय, ‘स्वच्छ जल, स्वच्छ मन’ हा संदेश केवळ एक अभियान नसून तो एक जीवनदृष्टी आहे. जलधारांना निर्मळ ठेवतानाच मनामध्येही जागरूकतेचा प्रकाश पसरविणारा हा संकल्प आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी संतुलित, सुरक्षित आणि शाश्वत भविष्याची पायाभरणी करणारी हीच खरी ऊर्जा ठरेल.हे अभियान झोन ४०अ खरसई अंतर्गत झोनल इन्चार्ज प्रकाश म्हात्रे जी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन ब्रँच चे मुखी मुकुंद श्रीवर्धनकर यांच्या सहकार्याने यशस्वी राबविण्यात आले त्याबद्दल प्रशासनाने आभार व कौतुक व्यक्त केले.

# नागपूर महानगरपालिकेत भाजपाचं मातृ देव भव:” शत प्रतिशत महिला

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** देशाच्या नवीन संसद भवनात प्रवेश करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षणाचे पहिले विधेयक मंजूर करून नारी शक्तीला सन्मान दिला होता.त्याच पावलावर पाऊल टाकत नागपूर महानगरपालिकेतही नवीन टाऊन हॉल मधून सत्तेची संपूर्ण धुरा महिलांकडे सोपवून सं मातृशक्तीच्या हातात देऊन, भारतीय जनता पक्ष इतिहास रचत आहे. महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्षांसह महापालिकेतील सर्वच महत्त्वाची पदे आता केवळ महिलाच भूषवणार असल्याची माहिती भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी आज दिली. महानगरपालिकेच्या निवडणुकांनंतर शासनाने महापौरपद महिलांसाठी आरक्षित केल्याचे जाहीर केले होते. मात्र, भारतीय जनता पक्षाने याही पुढे जाऊन प्रशासनातील प्रत्येक महत्त्वाच्या समितीचे नेतृत्व महिलांकडे देण्याचा धाडसी निर्णय घेतला. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी,मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजपचे सर्व आमदार आणि कोअर कमिटीने एकमताने हा निर्णय घेतला. प्रत्येक निर्णयावर आता मातृशक्तीची मुद्रा असेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या ऐतिहासिक निर्णयानुसार, केवळ महापौरच नव्हे तर स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी भाजपचे असणारे सर्व ११ सदस्य महिलाच असतील. तसेच, महापालिकेच्या १० विषय समित्यांचे अध्यक्षपद, परिवहन समितीचे अध्यक्षपद आणि आगामी काळात होणाऱ्या १० झोन सभापतींच्या निवडीत भाजपचे सर्व ९ सभापती हे मातृशक्तीच असतील.शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी सांगितले की, "स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतिहासात संपूर्ण प्रशासकीय पदे महिलांना देण्याची ही देशातील आणि कदाचित जगातील पहिलीच घटना आहे.

नागपूर शहर हे संपूर्ण जगासमोर महिला सक्षमीकरणाचा एक नवा आदर्श निर्माण करेल.

पुढील वर्षभरासाठी नागपूर महानगरपालिकेचा संपूर्ण कारभार हा महिलांच्या सक्षम हातांतून चालणार असून, भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी या निर्णयाद्वारे महिलांच्या नेतृत्वावर मोहोर उमटवली आहे

# वरचं बटण उघडंच ठेवणार, चाळीस वर्षांनंतर दादांसमोर लावेन!” शोकप्रस्तावावेळी रोहित पवार भावूक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नासिकेत पानसरे/ पनवेल :** महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनाबद्दल दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव मांडण्यात आला. या वेळी त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी आठवणींना उजाळा देताना भावुक होत अश्रू ढाळले.

“अजितदादा पवार नावाचा जादूगार संपूर्ण महाराष्ट्राला हसवत हसवत गेला. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा हरपला,” अशा शब्दांत रोहित पवारांनी काकांना श्रद्धांजली अर्पण केली.

“वरचं बटण उघडंच ठेवणार...”

भाषणादरम्यान रोहित पवार म्हणाले, “दादा मला नेहमी म्हणायचे, वरचं बटण लावत जा. पण एक मात्र ठरवलं आहे, चाळीस-पन्नास वर्षांनंतर जेव्हा त्यांची वरती भेट होईल, तेव्हा त्यांच्या समोर हे बटण लावेन. तोपर्यंत हे बटण असंच उघडं ठेवणार. कारण ते मला दररोज दादांची आठवण करून देईल.” या भावनिक विधानामुळे सभागृहात क्षणभर स्तब्धता पसरली.

“शारिरीक वजन कमी, राजकीय वजन वाढवेन”

रोहित पवारांनी अजितदादांच्या मिश्कील सल्ल्यांचाही उल्लेख केला. “एकदा दादा म्हणाले होते, तुझ्या झिपऱ्या वाढल्या आहेत, केस काप. त्यांच्या जाण्याच्या दिवशी मी आदरांजली म्हणून केस कापले. ते नेहमी म्हणायचे, शारिरीक वजन कमी कर आणि राजकीय वजन वाढव. मी त्यांना शब्द देतो, शारिरीक वजन कमी करेन आणि राजकीय वजन नक्की वाढवेन,” असे ते म्हणाले.

“दोषींना तुरुंगात टाकल्याशिवाय शांत बसणार नाही”

अजित पवारांच्या अपघाताचा उल्लेख करताना रोहित पवारांचा स्वर कठोर झाला. “दादांच्या अपघातासाठी जो कुणी दोषी असेल, तो कितीही मोठा असला तरी त्याला तुरुंगात टाकल्याशिवाय आणि शिक्षा दिल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. हा माझा लढा सुरूच राहील,” असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच कुटुंबीयांना उद्देशून त्यांनी, “तुमच्या राजकीय प्रवासात माझी गरज भासली तर मी कायम तयार असेन,” असे आश्वासन दिले. भावनांनी ओथंबलेल्या या भाषणामुळे सभागृहातील अनेक सदस्यही व्यथित झाल्याचे पाहायला मिळाले.

# मुंबईत ISECTCON 2026 चे आयोजन

## देशभरातील संजीवन शास्त्रज्ञ तज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी यांना एकत्र आणणारी परिषद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** देशभरातील संजीवन शास्त्रज्ञ (परफ्यूजन शास्त्र) क्षेत्रातील तज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी यांना एकत्र आणणारी प्रतिष्ठित परिषद ISECTCON 2026 यंदा दिनांक २७–२८ फेब्रुवारी २०२६ रोजी हॉटेल ऑरिका, मुंबई स्कायसिटी, अंधेरी (पूर्व) येथे सकाळी ९ - सायंकाळी ६ या वेळेत आयोजित करण्यात येत आहे. ही परिषद इंडियन सोसायटी ऑफ एक्सट्राकॉर्पोरेल टेक्नोलॉजि (ISECT) तर्फे आयोजित केली जात असून आधुनिक परफ्यूजन सायन्स आणि रुग्णसेवा सुधारणा यांवर सखोल चर्चा होणार आहे.भव्य परिषदेचे उद्घाटन




लोकसभेचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेमध्ये देशभरातील नामांकित तज्ञ, आंतरराष्ट्रीय वक्ते, वैज्ञानिक सत्रे, ई-पोस्टर सादरीकरण, उद्योग प्रदर्शन तसेच विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रमांचा समावेश असेल.

राष्ट्रीय परिषदेचे आयोजन रवींद्र शिवाजी सावर्डेकर (ऑर्गनायझिंग सेक्रेटरी), राजेंद्र कोकणे (अध्यक्ष), जगन्नाथ कालुगडे (उपाध्यक्ष), विकास माळी (चेअरमन), योगेश लुडबे (कोषाध्यक्ष), शशिकांत मेमाणे (सहसचिव) आणि रफिक शेख यांच्या नेतृत्वाखाली होत असून देशभरातील तज्ञ, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी ISECTCON 2026 ज्ञान, नवोपक्रम आणि व्यावसायिक सहकार्याचा एक महत्त्वपूर्ण मंच ठरणार आहे. परफ्यूजन विज्ञानातील नव्या संशोधनांना चालना देणे, आरोग्यसेवेची गुणवत्ता उंचावणे आणि तज्ञांमधील ज्ञानविनिमय वाढवणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

कोविड-१९ च्या कठीण काळात आरोग्य व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण झाला असताना संजीवन शास्त्रज्ञ आणि संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांनी जीवनरक्षक भूमिका बजावली. अतिदक्षता विभागातील गंभीर रुग्णांना कृत्रिम श्वसन, रक्ताभिसरण सहाय्य आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने स्थिर ठेवण्यासाठी त्यांनी अखंड परिश्रम घेतले. अत्यंत जोखमीच्या परिस्थितीतही रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी केलेले त्यांचे योगदान आरोग्यसेवेतील समर्पण, कौशल्य आणि मानवी मूल्यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरले. लहान मुलांमधील जन्मजात हृदयविकार तसेच हृदय प्रत्यारोपणासारख्या गुंतागुंतीच्या उपचार प्रक्रियांमध्येही त्यांच्या अचूक कौशल्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत आहे.

# यादव जी की लव्ह स्टोरी चित्रपटाविरोधात मोर्चाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्र करणी सेनाचे प्रमुख अजय सिंह सेंगर यांनी ‘यादव जी की लव्ह स्टोरी’ या हिंदी चित्रपटाविरोधात २७ फेब्रुवारी रोजी सेन्सॉर बोर्डावर मोर्चा काढण्याचा इशारा मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

या वेळी राज्य प्रवक्ते शैलेश पन्नालाल यादव, सुभाष चंद्र यादव, किरण सोनवणे, अंबिका प्रसाद यादव आदी उपस्थित होते. चित्रपटात यादव समाजाचे व भगवान श्रीकृष्ण यांचे चुकीचे चित्रण करण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी या चित्रपटामुळे हिंदू धर्म व यादव समाजाच्या भावना दुखावल्याचे सांगितले.

संबंधित चित्रपटाच्या निर्माता संदीप तोमर,




दिग्दर्शक अंकित भडना, अभिनेत्री प्रगती तिवारी व अभिनेता विशाल मोहन यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. २७ फेब्रुवारी रोजी विविध हिंदू संघटनांच्या सहभागातून सेन्सॉर बोर्डावर मोर्चा काढण्यात येणार असून राज्यात हा चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही, असा इशारा देण्यात आला. सरकारने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून चित्रपटावर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेतर्फे करण्यात आली.


# वीरशैव संत कक्कया महाराज जयंती उत्सव दिघामध्ये उत्सहात साजरा!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे ) :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिघा विभागामध्ये ढोर समाजाच्या वतीने वीरशैव संत कक्कया महाराज यांच्या जयंती उत्सव सोहळा रविवार दिनांक २२फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

संत कक्कया महाराज हे ढोर समाजातील समता, श्रमप्रतिष्ठा, मानवसेवा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे महान संत होते.त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने कक्कया महाराजांच्या मूर्तीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. समाज बांधवांनी मोठ्या श्रद्धा व उत्साहाने यात सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे समस्त ढोर कक्कया समाज महासंघाचे अध्यक्ष मा. श्री. निवृत्ती काशिनाथ सावळकर




साहेब,महासंघाचे सचिव प्रकाश दरवेशी साहेब,जेष्ठ समाजसेवक सूर्यकांत इंगळे साहेब, समस्त कक्कया महासंघाचे सचिव श्री. नवनाथ कोकणे साहेब, महासंघाचे प्रवक्ते श्री. शशिकांत सोनवणे साहेब तसेच संत कक्कय्या विकास संस्था धारावीचे सचिव श्री. राजेश खंदारे साहेब यांनी आवर्जून उपस्थित राहून समाजाला मार्गदर्शन केले.

दिघा विभागातील समाजाच्या नगरसेविका सौ. अरुणाताई शिंदे, कमिटीचे वरिष्ठ सल्लागार श्री. बाबुराव सावळे यांनी देखील कार्यक्रमास उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या.

वीरशैव संत कक्कया महाराज जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष श्री. प्रदीप सदाफुले, उपाध्यक्ष श्री. शंकर शिंदे, सचिव श्री. रवींद्र बोराडे, उपसचिव श्री. मनोज व्हटकर , खजिनदार श्री. मारुती नारायणकर, उपखजिनदार श्री. माधव फुलपगार तसेच कमिटी सदस्य श्री. राम सावरे, श्री. नामदेव खरात, श्री. ज्ञानेश्वर फुलपगार, श्री. बालाजी सावळे, श्री. द्रोपद फुलपगार व कमिटीचे सर्व सभासद यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.दिघा विभागातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली व संत कक्कया महाराजांच्या विचारांना अभिवादन केले.


# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रिसोड येथे संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजितसिहं ठाकूर :** येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वच्छतादूत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गाडगेबाबांच्या सामाजिक क्रांतीच्या विचारांना उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य संजय नरवाडे, ज्येष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे, शिक्षक प्रतिनिधी खुशाल राठोड आणि महिला प्रतिनिधी शोभा राऊत यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संजयराव




देशमुख यांनी गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "शिक्षण, स्वच्छता आणि व्यसनमुक्ती हाच गाडगेबाबांच्या जीवनाचा खरा संदेश आहे, जो आजही तितकाच प्रस्तुत आहे." पुढे बोलताना प्राचार्य संजय देशमुख म्हणाले की गाडगे महाराज यांनी अनेक धर्मशाळा व रुग्णालय यांची स्थापना केली तसेच त्यांचे जाही ठिकाणी कीर्तन व्हायचे त्या ठिकाणी अगोदर ते स्वतः हातामध्ये खराटा घेऊन सर्व परिसर स्वच्छ करायचे. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून गाडगे महाराजांनी त्या काळामध्ये अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी परंपरा यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी अतोनात प्रयत्न केले त्याचबरोबर शिक्षणाचे महत्त्व विशद करताना एक वेळ कमी जेवा मात्र आपली मुलं बाळ शिकवा असे ते आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला आवाहन करत होते.

यावेळी उपप्राचार्य संजय नरवाडे व खुशाल राठोड यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. त्यांनी गाडगेबाबांच्या 'दशसूत्री'चे महत्त्व विषद करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले. सदर कार्यक्रमास विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. अतिशय शिस्तबद्ध वातावरणात हा जयंती सोहळा पार पडला.

# पनवेलमध्ये 'क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले' भव्य सभागृहासाठी अधिकृत मागणी ; महापौरांकडे निवेदन सादर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल शहरात थोर समाजसुधारक Savitribai Phule यांच्या नावाने भव्य सभागृह उभारण्याची अधिकृत मागणी करण्यात आली आहे. क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या वतीने यासंदर्भात Panvel Municipal Corporation चे मा. महापौर नितीन पाटील यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.



संस्थेच्या शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेऊन क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा तसेच सावित्रीबाई फुले यांचे पुस्तक भेट देत शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यानंतर सभागृह उभारणीसंदर्भातील सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या आणि शिक्षण प्रसारासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या नावाने पनवेल शहरात अद्याप कोणतेही अधिकृत सभागृह किंवा स्मारक भवन उभारण्यात आलेले नाही. सामाजिक न्याय, स्त्री सक्षमीकरण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांचे कार्य ऐतिहासिक आणि प्रेरणादायी आहे.

त्यामुळे महानगरपालिकेने नियमानुसार योग्य भूखंड निश्चित करून महासभेत ठराव मंजूर करावा व त्यांच्या नावाने भव्य सभागृह उभारण्याची प्रशासकीय प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, अशी ठोस मागणी शिष्टमंडळाने केली आहे.संस्थेच्या अध्यक्षा सौ. रुपालीताई शिंदे यांनी सांगितले की, या मागणीची विधिवत दखल घेऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत सकारात्मक निर्णय जाहीर करावा, हीच अपेक्षा आहे.यावेळी सौ. स्नेहा धुमाळ, सौ. प्रिया गंगावणे, सौ. ज्योती तातरे, सौ. सुषमा मयेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. आता महानगरपालिका प्रशासन या मागणीवर कोणती भूमिका घेते, याकडे पनवेलकरांचे लक्ष लागले आहे.

# ज्ञानेश्वरी जीवन उध्दाराची संजीवनी - विजयकुमार फड

## स्व.जनुभाऊ रानडे स्मृती व्याख्यानमालेस प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : सुंदर संस्कृती आणि माणूस घडवण्याचे काम आपल्या अध्यात्माने केले आहे . ज्ञानेश्वरीने देह हेच मंदिर याचे भान दिले असल्याने ज्ञानेश्वरी ग्रंथ जिवन उध्दराची संजिवनी असल्याचे प्रतिपादन निवृत्त जिल्हाधिकारी विजयकुमार फड यांनी केले आहे. शहरातील नूतन विद्यालय सभागृहात आयोजित स्व. जनुभाऊ रानडे व्याख्यान मालेचे पहिले पुष्प गुंफताना सोमवार २३ फेब्रुवारी रोजी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आनंद गुजर, हरिभाऊ चौधरी, उपेंद्र बेलुरकर उपस्थित होते. ते म्हणाले की, ज्ञानेश्वरी वाचुन स्वतःला जाणने हिच खरी भक्ती आहे. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्द जीवन उध्दाराची संजीवनी आहेत. ज्ञानेश्वरीच्या वाचनाने आपल्या सर्व अडचणी दूर होतात. आपल्या हातून चुकीचे काही घडत नाही. त्यामुळे आपण ज्ञानेश्वरी अंतःकरणापासुन वाचायला हवी. समाजाला दिशा देण्याचे महान कार्य माउलींनी केले आहे.



संत निवृत्तीनाथ,संत ज्ञानेश्वर,संत सोपानदेव,संत मुक्ताबाई आदी भावंडांचा समाजाने आदर्श घेतला तर कौटुंबिक व सामाजिक कलह निर्माण होणार नाहीत. एवढेच नव्हे तर,देशभरातील पन्नास टक्के केसेस कमी होतील.केवळ सकारात्मक मानसिकतेतून मानवाची प्रगती होते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आपण आनंदाने जगले पाहिजे हेच ज्ञानेश्वरी शिकवत असल्याने,माऊली सुखाचे आगर असल्याचे विजयकुमार फड यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले . भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुल, आयोजित आणि देवगिरी नागरी सहकारी बँक लि. छत्रपती संभाजीनगर प्रायोजित स्व. जनुभाऊ रानडे स्मृती व्याख्यानमालेचे १४ व्या वर्षाचे पहिले पुष्प ' समग्र ज्ञानेश्वरी माऊली ' या विषयावर गुंफले. संतोष नेवपुरकर यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे यांनी दिला. उपेंद्र बेल्लूरकर यांनी प्रास्ताविक केले. विजय चौधरी यांनी सुत्रसंचालन केले. तर विकास पिंगळे यांनी आभार मानले. सामूहिक पसायदानाने सांगता झाली .कार्यक्रम यशस्वीतेसाठी विवेकानंद शैक्षणिक संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व देवगिरी बॅंकेचे अधिकारी कर्मचारी यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रमासाठी श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती.

# कोकण रेल्वेच्या 'तेजस एक्सप्रेस'चा सावळा गोंधळ; प्रवाशांच्या हालअपेष्टांबाबत रिपाई पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी** : भारतीय रेल्वेची 'प्रिमियम' सेवा म्हणून ओळखली जाणारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स (CSMT) ते मडगाव तेजस एक्सप्रेस गेल्या काही दिवसांपासून सातत्याने तासनतास उशिराने धावत आहे. या विलंबाचा फटका ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि लहान मुलांना बसत असून, रेल्वे प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराविरोधात पनवेल शहर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी थेट रेल्वे मंत्र्यांकडे दाद मागितली आहे.

होळीच्या तोंडावर कोकणवासीयांचे हाल

पुढील आठवड्यात कोकणचा सर्वांत मोठा सण 'होळी' (शिमगा) येत आहे. या उत्सवासाठी हजारो चाकरमानी तेजस एक्सप्रेसने प्रवासाचे नियोजन करतात.



मात्र, गाडीच्या सततच्या विलंबामुळे प्रवाशांचे वेळापत्रक कोलमडले आहे. "प्रवाशांनी जादा भाडे मोजूनही त्यांना साध्या गाडीसारखा अनुभव येत असेल, तर रेल्वेच्या प्रतिमेचे काय?" असा सवाल निलेश सोनावणे यांनी उपस्थित केला आहे.

प्रवाशांच्या मुख्य समस्या:

आरोग्याचा प्रश्न: गाडी तासनतास खोळंबल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना आपल्या वेळेवर औषधे घेणे कठीण होत आहे.

नोकरदारांचे नुकसान: वेळेचे नियोजन करून प्रवास करणाऱ्या व्यावसायिक आणि नोकरदारांची महत्त्वाची कामे रद्द होत आहेत.

> **"तेजस एक्सप्रेस ही वेगासाठी ओळखली जाते, पण सध्या ती विलंबाचा नवा विक्रम प्रस्थापित करत आहे. विशेषतः होळीच्या काळात कोकणवासीयांचा प्रवास सुखकर होण्यासाठी रेल्वे प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल**
> **— निलेश सोनावणे (अध्यक्ष, पनवेल शहर आरपीआय - आठवले)**

गाडी उशिरा असताना प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना मिळत नसल्याने स्थानकावर ताटकळत राहावे लागत आहे.

रेल्वे मंत्र्यांकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या:

या संदर्भात निलेश सोनावणे यांनी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव , केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यामंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार , आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी खालील मागण्या मांडल्या आहेत:

तेजस एक्सप्रेसच्या विलंबाचे तांत्रिक कारण शोधून त्यावर तातडीने उपाययोजना करावी.ज्यांचा पुढील विलंबामुळे प्रवास चुकला तर त्या प्रवासाचा खर्च मग तो विमान प्रवास असो का रेल्वे बस त्याचा सर्व खर्च रेल्वे प्रशासनाने त्वरित प्रवाशांना द्यावा

गाडी उशिरा असल्यास प्रवाशांना SMS द्वारे आगाऊ सूचना मिळावी. विलंबाच्या काळात रेल्वे स्थानकांवर व प्रवासात अडकून पडलेल्या प्रवाशांना मोफत अल्पोपहार व पाण्याची विशेष सोय करावी.

# नागपूर प्रेस फोटोग्राफर व कॅमेरामन समूहातर्फे स्व . रजनीश काकडेंना पत्रकार भवनात श्रद्धांजली

## ज्येष्ठ छायाचित्रकार पत्रकार रजनीश काकडे यांचे निधन; पत्रकारितेवर शोककळा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : ज्येष्ठ छायाचित्र पत्रकार तसेच Mumbai Press Club चे उपाध्यक्ष रजनीश काकडे (वय ५५) यांचे निधन झाल्याची अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

रजनीश काकडे हे केवळ अनुभवी छायाचित्रकार नव्हते, तर नव्या पिढीतील अनेक छायाचित्र पत्रकारांचे मार्गदर्शक होते. आपल्या कॅमेऱ्यातून त्यांनी अनेक ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण क्षण संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणे टिपले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे असंख्य तरुणांना पत्रकारितेची योग्य दिशा मिळाली. सत्य, धैर्य आणि संवेदनशीलता यांचा संगम त्यांच्या कार्यातून नेहमीच प्रकर्षाने दिसून येत असे.

त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात सकाळ ग्रुपमधून केली. त्यानंतर त्यांनी Hindustan Times मध्ये तीन वर्षे काम केले. पुढे ते Associated Press मध्ये दाखल झाले आणि गेली अठरा वर्षे ते या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेसोबत कार्यरत होते. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी अनेक पुरस्कार प्राप्त केले होते.

त्यांच्या निधनामुळे माध्यम क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांची नम्रता, तल्लख दृष्टी, पत्रकारितेप्रती असलेली निष्ठा आणि नवोदितांना दिलेले प्रोत्साहन यासाठी ते सदैव स्मरणात राहतील.त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले होते. त्यानंतर शिवाजी पार्क स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, नागपूर प्रेस फोटोग्राफर व कॅमेरामन समूहातर्फे पत्रकार भवन येथे स्वर्गीय रजनीश काकडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या कुटुंबीयांना, मित्रपरिवाराला आणि संपूर्ण पत्रकार बांधवांना या दुःखातून सावरण्याची शक्ती लाभो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

# सणसर येथील पालखी महामार्गावरील अपूर्ण कामामुळे अपघाताची मालिका सुरु

**दैनिक युवक आधार**

**सणसर / विकास क्षत्रिय** : सणसर ता.इंदापूर पालखी महामार्गावरील अपूर्ण कामामुळे सणसर जाचकवस्ती येथे झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महामार्गावरील खड्डे व अपूर्ण रस्त्यामुळे वाहनाचा ताबा सुटून अपघात झाला.या घटनेत स्थानिक युवक जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.ग्रामस्थांनी पालखी महामार्गावरील



कामे दीर्घकाळ प्रलंबित असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.वारंवार अपघात घडत असून प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या अपघातामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून नागरिकांनी संबंधित विभागाकडे लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे.

> **सणसर येथील पालखी महामार्गचे काम जाणूनबुजून अपूर्ण ठेवले असून आजच्या सारखे असे भरपूर अपघात घडून परिसरातील युवक गंभीर जखमी झाले असून सुद्धा भा रा रा प्रा चे अधिकारी लक्ष देणार नसतील तर लवकरच माहिती अधिकार समिती इंदापूर तालुक्यामार्फत रास्तारोको करून NHAI चे अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत याची संबधीत अधिकारी व ठेकेदार यांनी नोंद घ्यावी**
> **मा. विकास क्षत्रिय**
> **अध्यक्ष,इंदापूर तालुका माहिती अधिकार समिती**

# सहावे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलन ७ मार्चला

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : सहावे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलन शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या डॉ. ऐ. के. डोरले सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन व विचारधारा विभागाच्या वतीने आयोजित साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून ९० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. डॉ. अक्षयकुमार काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

साहित्य संमेलनाची सुरुवात सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडीने होणार आहे. सकाळी १० वाजता उद्धाटन समारंभ होणार असून या कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर भूषविणार असून उद्घाटक म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, विशेष अतिथी म्हणून अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस पद्मश्री श्री जनार्दनपंत बोथे, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राज्यपालनामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, श्री. प्रकाश महाराज वाघ, श्री ज्ञानेश्वर रक्षक, ॲड. श्री. अशोक यावले, श्री सुबोध दादा, श्री बाबाराव पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. दुपारी १२ ते २ दरम्यान 'ग्रामगीता व सद्य:काळात ग्रामविकासाची अपरिहार्यता आणि ग्रामविकासाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद होणार आहे.

परिसंवादाचे अध्यक्षस्थान माजी मराठी विभाग प्रमुख व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रमोद मुनघाटे भूषविणार असून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विजयाताई मारोतकर व माजी प्राचार्य डॉ. तीर्थराज कापगते विचार व्यक्त करणार आहे. दुपारी २.३० वाजता 'राष्ट्रनिर्माण कार्य व राष्ट्रसंतांची भूमिका आणि युवकांकडून अपेक्षा' या विषयावर आयोजित परिसंवादाचे अध्यक्षस्थान मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे भूषविणार असून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरविंद देशमुख (अमरावती) व श्री. अरविंद राठोड विचार व्यक्त करणार आहे. ४.४५ वाजता आयोजित समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी कुलगुरू डॉ. श.नु. पठाण, विशेष अतिथी म्हणून राष्ट्रधर्म प्रचार समिती आजीवन प्रचारक अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ नांदुरा येथील संचालक आचार्य हरिभाऊ वेरुळकर यांची उपस्थिती राहणार आहे.

साहित्य संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे व अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी केले आहे.

# ऐतिहासिक चवदार तळे सुशोभीकरणाचे २० मार्चला भूमिपूजन – सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९व्या वर्धापन दिनानिमित्त २० मार्च २०२६ रोजी शासन स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, याच दिवशी चवदार तळ्याच्या सुशोभीकरणाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ५५ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, वर्धापन दिन सोहळा व भूमिपूजन कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन करण्याचक निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिल्या.

ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत



गोगावले, विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनिल वारे, सहसचिव सोमनाथ बागुल, सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, तहसीलदार महेश शितोळे यांच्यासह संबंधित संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, २० मार्च १९२७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे सामाजिक समतेसाठी ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रह केला होता. त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ यंदाचा ९९वा वर्धापन दिन अधिक व्यापक व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. सुशोभीकरणाच्या कामामुळे या ऐतिहासिक स्थळाला नवे वैभव प्राप्त होणार असल्याने संबंधित यंत्रणांनी कार्यक्रमाचे शिस्तबद्ध आणि काटेकोर नियोजन करणे आवश्यक आहे. या वर्धापन दिनानिमित्त देशभरातून मोठ्या संख्येने अनुयायी महाड येथे येत असल्याने भूमिपूजनाच्या कार्यक्रमात सर्वांचा सहभाग सुनिश्चित करणे, कार्यक्रमस्थळी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, मोठ्या एलईडी स्क्रीनद्वारे सुशोभीकरणा अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची माहिती नागरिकांना दाखविणे, तसेच वाहतूक, सुरक्षा, वैद्यकीय सुविधा आणि स्वच्छतेची योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.